मंगळवार, 13 सप्टेंबर 2022
किमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - 02 अंक - 43
Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी

MARATHI • DAINIK • AURANGABAD (MAHARASHTRA) • TUESDAY 13 SEPTEMBER 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | YEAR-02 • ISSUE-43 • TITLE CODE : MAHMAR51117 • PAGE-8 • PRICE-5



(छाया: आशिष तांबटकर)

# पैठणच्या संत ज्ञानेश्वर उद्यानाचा पुनर्विकास करु

## आम्ही दिलेला शब्द पाळतो : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

आधुनिक केसरी न्यूज

दादासाहेब घोडके

**पैठण : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पैठण येथील सभेला अलोट जनसमुदाय जमला होता. शहरातील कावसानकर स्टेडियमवर या सभेचे रोहयो मंत्री संदिपान भुमरे यांनी आयोजन केले होते. यावेळची गर्दी बघुन हिच खरी शिवसेना आहे, पैठणच्या संत ज्ञानेश्वर उद्यानाचा पुनर्विकास करु,असे म्हणत पैठण नगरीत प्रथमच मुख्यमंत्री झाल्यावर आलेले एकनाथ शिंदे भारावून गेले.**

यावेळी बोलताना मुख्यमंत्री म्हणाले की, ही सच्या शिवसैनिकांनी गर्दी असुन भुमरे मामा तुमच्यावर एवढे लोक प्रेम करतात हे आज कळले. मी दिलेला शब्द पाळतो,अन् भुमरेंनीही माझा शब्द पाळला. सगळ्यांना मुठ माती देत सत्तेतुन पाय उतार होवुन आम्ही ५० आमदार सोबत येवून पुन्हा सत्ता स्थापन केली.यामागे लाखो नागरिकांचा आशिर्वाद होता.आडीच वर्षे सत्तेत असताना लोकांचे कामे होत नव्हते म्हणून आम्ही हा उठाव केला आणि आम्ही भाजपचे देवेंद्र फडणवीस यांच्या सोबत जावून सत्ता स्थापन केली. त्याला महाराष्ट्रातील जनतेन पसंती दिली आहे.मी मुख्यमंत्री जरी असलो तरी मी सामान्य माणूस आहे. त्यामुळे राज्यातील प्रत्येक माणूस मुख्यमंत्री झाला असे मला वाटते.

आरे टिका करणे तुमचे काम आहे. परंतु एकनाथ शिंदे सकाळपासुन जनतेच्या कामासाठी सज्ज असतो.आता आमच्यावर कोणाचा रिमोट कंट्रोल नाही. त्यामुळे देवेंद्र आणि मी नक्कीच सरकारच्या माध्यमातून कामे करु. गर्दीच पाहायची होती तर भुमरे मामाच्या पैठणला या,आरे गद्दार अन् खोके म्हणण्यापेक्षा आता तुम्ही आत्मपरीक्षण करा,शेतकऱ्यांना कर्जे परत फेडीत अनुदान दिले,अतिवृष्टीचा फटका बसलेले शेत्र वाढवले, संत ज्ञानेश्वर उद्यानाचा विकास नक्कीच केला जाईल.पैठण शहरात १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय तसेच पैठण कलस्टर उभारणीसाठी प्रयत्न करुन भुमरे यांनी मागणी केलेल्या सर्वच मागणीला मंजुरी देवुन ऐतिहासिक पैठणच्या विकासाला चालना देण्याच काम केले जाईल.

राष्ट्रवादीवर टिका करत कसं काय पाटील बरं हाय का ,काल दिल्लीत घडलं ते खरं हाय का म्हणत नाव घेणे टाळलं,निवडणूक आली का मराठी माणूस आठवतो,आता घरोघरी फिरता हे आधीच करायला पाहिजे होते,आधी बाळासाहेबांचे विचार बुडवून दोन्ही कॉंग्रेसशी हातमिळवणी केली त्यामुळे गद्दार कोण आम्ही का तुम्ही विचार करा ? आम्ही तर बाळासाहेबांचे व आंनद दिघे साहेबांचे आजही पाईक आहोत. आता नैराश्याने काही बोलु नका. आता हे राज्य म्हणजे शिवसेना भाजपाचे सरकार आहे, पुढच्या निवडणूकात आमचे सर्वच सहकारी निवडून येतील, असा विश्वासही शेवटी मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

तत्पूर्वी मंत्री संदिपान भुमरे यांनी ब्रम्हगव्हान उपसा सिंचन योजना पुर्ण करा, म्हणून मी गेल्या आडीच वर्षांपासून पाठपुरावा घेत होतो. मात्र निधी मिळाला नाही. पण एकनाथ शिंदे साहेब मुख्यमंत्री झाले अन् ब्रम्हगव्हानचा प्रश्न सुटला. त्यामुळे पैठण तालुक्यातील २० हजार हेक्टर जमीन ओलीताखाली येईल, तसेच पैठण तालुक्यातील वाटरग्रीड योजना मंजूर झाल्याने घर तिथे पाणी मिळणार आहे.आत एक प्रमुख मागणी आहे, संत ज्ञानेश्वर उद्यानाचे पुनर्वसन करा आणि त्यासाठी आराखडा तयार आहे, पैठणच्या संत ज्ञानेश्वर उद्यानासाठी आडीशे कोटी रुपये द्यावे, अशी मागणी करत शहरात १०० खाटाच्या उपजिल्हा रुग्णालयासाठी मंजूरी द्यावी, आशा विविध मागण्या केल्या.जमलेल्या गर्दीवरुन मंत्री भुमरे यांनी विरोधकांचा चांगलाच समाचार घेत आता त्यांच्या पायाखालची वाळु सरकली. त्यामुळे भुमरेच्या नादी लागु नका. आरे पन्नास काय लाखाचा जनसमुदाय कावसानकर स्टेडियमवर जमला आहे, या पाहायला म्हणत आंबादास दानवे व चंद्रकांत खैरे यांचा खरपूस समाचार घेतला.

या सभेसाठी खास आकर्षण राहीलेले आमदार शहाजी बापु यांनी आपल्या भाषणातुन चंद्रकांत खैरे,आबादास दानवेंवर टिका करत आता खैरे खासदार होणारच नाही. कारण पैठणची जनता आता भुमरे यांच्या पाठीमागे आहे. काय पैठण,काय मैदान,काय विराट सभा म्हणत माजी मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांनी कामच केले नसल्याने आम्ही मुख्यमंत्री शिंदे साहेबांच्या सोबत आहोत. शेवटी काय डोंगर,काय झाडी म्हणताच जनसमुदायाने घोषणाबाजी केली.

विलासबापु भुमरे यांनी प्रस्ताविक करत उपस्थित मान्यवरांचे स्वागत करुन पैठण तालुक्यातील विविध योजना मार्गी लागणार आसल्याचे सांगितले. याच स्टेडियमवर १९९४ साली मा.बाळासाहेब ठाकरे यांच्या झालेल्या दार उघड बये दार उघड म्हणत विराट सभेची आठवण आज तुमच्या उपस्थितीत झाली, असे म्हणत सर्वाचे अभार व्यक्त केले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे स्वागत मंत्री संदिपान भुमरे यांनी पैठणीचा मानाचा शेला बांधून शांतीब्रम्ह नाथ महाराजाची प्रतिमा देवुन केला. यासभेसाठी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे,केंद्रीय मंत्री भागवत कराड, विधानसभा माजी सभापती हरिभाऊ बागडे,मंत्री आब्दुल सत्तार, मंत्री दिपक केसरकर,मंत्री आतुल सावे, मंत्री उदय सामंत, आमदार शहाजी बापु,आमदार संतोष बांगर,माजी मंत्री आर्जुनराव खोतकर, आमदार प्रशांत बंब,जि.प.माजी सभापती विलासबापु भुमरे,माजी मंत्री सुरेश नवले, खा.हेमंत पाटील,आमदार संजय शिरसाट,आमदार प्रदिप जैस्वाल,आमदार प्रा.रमेश बोरनारे, शिवसेना जिल्हाध्यक्ष राजेंद्र जंजाळ, पैठण भाजपा तालुकाअध्यक्ष डॉ.सुनील शिंदे,सरचिटणीस लक्ष्मण औटे,जिल्हा प्रमुख रमेश पवार,भाजपा महिला प्रदेशाउपाध्यक्षा रेखाताई कुलकर्णी,पाचोडचे सरपंच शिवराज भुमरे,मार्केट कमेटीच्या संचालक वर्षाताई भुमरे,शहर व्यापारी महासंघाचे अध्यक्ष पवन लोहीया,तालुका व्यापारी महासंघाचे अध्यक्ष,ज्ञानेश्वर उगले,रामेश्वर सुसे,गणेश मडके,माजी नगरसेवक शहादेव लोहारे,नामदेव खरात,विलासबापु प्रतिष्ठानचे शेखर शिंदे,शहरप्रमुख तुषार पाटील,जनार्दन मिटकर,तसेच शहरातील व तालुक्यातील नागरिकांची उपस्थिती होती. यावेळी अनेकांनी मुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत शिंदे गटात प्रवेश केला. यात प्रतिष्ठान शिक्षण मंडळाचे अध्यक्ष राजेंद्र शिसोदे,सचिव रवींद्र शिसोदे यांच्यासह तालुक्यातील शेकडोंनी प्रवेश केला. तसेच संत ज्ञानेश्वर उद्यानाचा विकासासाठी भरीव निधी देवुन उद्यानाच्या विकास संदर्भात मुख्यमंत्री शिंदे यांचे शतशः आभार माणुन उद्यानाची प्रतिमा प्रा.संतोष गव्हाणे,रमेश लिंबोरे,बाळु आहेर,संतोष गोबरे,विजय सुते यांनी भेट दिली.

## पावसाचा कहर : पुरात वाहून गेल्याने दोघांचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**यवतमाळ :** जिल्ह्यात सतत पाउस सुरु असून नदी, नाले दुथडी भरुन वाहत आहे. नदी, नाल्याला आलेल्या पुरात वाहुन गेल्याने दोन जणांचा मृत्यू झाला. ही घटना पांढरकवडा तालुक्यातील दहेली तांडा व सोनबर्डी येथे घडली. ११ सप्टेंबर रोजी दहेली तांडा येथील भारत पुरूषोत्तम राठोड (१३) हा मुलगा गांवालगत नाल्यावर दुपारी ३:३० वा चे सुमारास घरुन शौचालय साठी म्हणून गेला होता. परंतू तो परत आला नाही. काल सकाळ पासून पाऊस सुरू असल्याने नाला भरून वाहत होता. त्यातच भारत घरी न आल्याने त्याचा गांवामध्ये व आजु बाजुचे परीसरात शोध घेतला असता तो गवसला नाही . नाल्याला पुर असल्याने तो वाहुन गेला असेल म्हणुन आज १२ सप्टेंबर रोजी सकाळी ८ वाजताच्या सुमारास शोध घेत असता भारत हा पुना जाधव याचे शेतालगत नाल्यात पाण्यात बुडुन मरण पावलेला दिसुन आला.तसेच सोनबर्डी येथील




बंडु राघोजी कोहचाडे (५५) हा इसम ११ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५:३० दरम्यान शेतामध्युन गांवामध्ये घरी परत येत होता. पुलावर गुडघ्या पर्यन्त पाणी वाहत असल्याने त्यांनी पाण्यातुन गांवामध्ये येण्याचा प्रयत्न केला. यातच त्यांचा तोल गेल्याने ते पाण्यात पडुन पुरात वाहुन गेले. यावेळी त्यांना गावातील संदिप कन्नाके याने पाहीले होते. परंतु पुलावर पाणी जास्त असल्यामुळे बंडु कोहताडे याना वाचविता आले नाही. रात्री प्रर्यन्त त्यांचा शोध घेतला असता ते मीळुन आले नाही. आज १२ सप्टेंबर रोजी सकाळी ८ वाजताच्या सुमारास बंडु कोहचाडे यांचा मृतदेह आकोली शेत शिवारामध्ये नाल्यात मिळुन आला.

## महागाईचा दर ७ टक्क्यांवर

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** ऑगस्ट महिन्यात देशातील किरकोळ महागाई दरात वाढ होऊन तो ७ टक्क्यांवर पोहचला आहे. यामुळे आता पुन्हा व्याजदर वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. याचबरोबर, देशाच्या किरकोळ चलनवाढीतील (CPI Inflation) मागील तीन महिन्यांपासूनची घसरणीची मालिका देखील ऑगस्ट महिन्यामध्ये खंडीत झाली.

ऑगस्ट महिन्यातील किरकोळ महागाई दरात झालेल्या वाढासाठी प्रामुख्याने खाद्यपदार्थांच्या किंमतीमध्ये झालेली वाढ जबाबदार मानली जात आहे. आज(सोमवार) जाहीर झालेल्या सरकारी आकडेवारीत ही बाब समोर आली आहे. सरकारी आकडेवारीनुसार, ग्राहक किंमत निर्देशांक (CPI) आधारित किरकोळ महागाई जुलैमधील ६.७१ टक्क्यांवरून ऑगस्टमध्ये ७ टक्क्यांवर पोहोचली आहे. गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये हा दर ५.३० टक्के होता. किरकोळ महागाई दरातील वाढ हे स्पष्टपणे सूचित करते की देशात महागाई प्रचंड वाढलेली आहे. देशात खाद्यपदार्थांच्या तसेच घरगुती वस्तूंच्या किमती गगनाला भिडल्या आहेत. याशिवाय, जुलैमध्ये देशातील औद्योगिक उत्पादन (IIP) २.४ टक्के वाढले आहे. वर्षभरापूर्वी जुलै २०२१ मध्ये देशातील औद्योगिक उत्पादनात ११.८ टक्क्यांनी वाढ झाली होती. राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाने (एनएसओ) आज जाहीर केलेल्या औद्योगिक उत्पादन निर्देशांकाच्या (आयआयपी) आकडेवारीवरून ही माहिती मिळाली आहे. ग्राहक किंमत निर्देशांकाची (CPI) सध्याची पातळी भारतीय रिझर्व्ह बँकेने (RBI) निर्धारित केलेल्या सहा टक्के मर्यादेपेक्षा पूर्ण एक टक्का वर आहे. खरं तर, किरकोळ महागाईची पातळी सलग आठ महिन्यांपासून आरबीआयच्या उद्दिष्टापेक्षा जास्तच आहे. महागाईवर नियंत्रण ठेवण्यासाठी रिझर्व्ह बँकेलाही वारंवार व्याजदरात वाढ करावी लागली आहे. परंतु, आतापर्यंत याला निश्चित केलेल्या मर्यादेत आणता आलेले नाही. महागाई दराचे हे आकडे तज्ज्ञांच्या अंदाजापेक्षाही जास्त आहेत. रॉयटर्सने केलेल्या सर्वेक्षणात तज्ज्ञांनी ऑगस्टमध्ये महागाईचा दर ६.९ टक्के राहण्याचा अंदाज व्यक्त केला होता.




# शाश्वत शिक्षणाची गंगोत्री...

आधुनिक केसरी

तरीही २०२१ पासून ही शाळा पूर्णपणे दप्तर विरहित करण्याचे संचालक अतुलजींनी ठरवले आहे. तसेच शाश्वत इंडिया फेलोशिप ही त्यांची महत्वाकांक्षी योजना आहे. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे, संविधानातील तरतुदी, घटनात्मक अधिकार, हक्कांबरोबरच कर्तव्याची जाणीव आणि जैवविविधतेतील परस्पर पूरक संबंध यांचे भान विद्यार्थ्यांना यावे हा व्यापक उद्देश यामागे आहे. यात निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा पी एच डी च्या शिक्षणापर्यंतचा पुस्तकांचा खर्च शाळेमार्फत केला जाईल. या शाळेतील तिसरीच्या विद्यार्थ्यांनी स्वतः चित्र काढून आणि माहिती लिहून ' Insects ' विषयावर इतके अप्रतिम पुस्तक तयार केले आहे की आपल्या शाळांमधील दहावीच्या विद्यार्थ्यांना सुद्धा असे पुस्तक तयार करता येईल का याची शंका वाटते. ही शाळा दाखवण्यासाठी अतुलजींनी ४/५ विद्यार्थी आमच्यासोबत दिले होते. ते



अतिशय आत्मविश्वासाने आपल्या शाळेबद्दल भरभरून बोलत होते. माझ्यासोबत काही पालकही शाळा बघायला आले होते. त्या पालकांच्या प्रश्नांनाही या विद्यार्थ्यांनी समाधानकारक उत्तरे दिली. या शाळेतील सगळ्याच गोष्टींचा आणि प्रयोगांचा आढावा या लेखात घेणे शक्य नाही.

पण या सगळ्याचे श्रेय त्या ठिकाणी समर्पित भावनेने आणि कल्पकतेने काम करणारे अतुल गायगोले, त्यांच्या पत्नी अमृता, शिक्षकवर्ग आणि इतर कर्मचारी या सगळ्यांना आहे. मी दोन दिवस पूर्ण वेळ या शाळेत राहिलो आणि भरभरून ही विद्येची गंगोत्री माझ्या तनामनात साठवून घेण्याचा प्रयत्न केला. मी इथे गंगोत्री हा शब्द जाणीवपूर्वक वापरला आहे. गंगेचा उगम असतो छोटाच, पण शुद्ध आणि निर्मळ .उगमाजवळ शुद्ध आणि निर्मळ असलेली गंगा जसजशी पुढे जाते, तिला अनेक नद्या येऊन मिळतात. आणि तिचे स्वरूप विशाल होत जाते. काठांवरच्या गावांना ती समृद्ध करत जाते. पण आज आपल्याकडील शिक्षणाची गंगा मलीन झाली आहे. तिला शुद्धीकरणाची गरज आहे. या शाश्वत कन्सेप्ट स्कूलच्या स्वरूपात उगम पावलेली गंगोत्री मात्र या मलीन शिक्षणक्षेत्राला आपले हरवलेले पावित्र्य आणि आत्मा पुन्हा मिळवून देईल. गरज आहे ती अशा शाश्वत शाळेला बळ देण्याची. मग खुशाल कालवे काढा आणि या मातीला सुजलाम सुफलाम बनवा.



## आनंदी पहाट

# प्रत्येक चमकणारी वस्तू सोने नसते

आधुनिक केसरी

आपण प्रत्यक्षांत जे नाहीत ते आहोत असे जगाला दाखवण्याच्या केविलवाणी प्रयत्नांत आपला अहंकार आणि दंभ वाढत असतो, त्यामुळे ती समजण्याची जाणीवच उरलेली नसते. मोठेपणाच्या अट्टाहासाने एक वेळ अशी येतेच कि, अनेक बाबतीत आपला अभ्यास कमी आहे आणि खोटेपणा लपवण्याची धडपड सुरु आहे हे स्पष्ट होते. निर्माण केलेला अभास हा फार काळ टिकत नसतो, हे न समजणे हीच खरी उणिव असते. अभासाचा विपरीत परिणाम काहीवेळा काही विवाहांच्या पश्चात घडून आल्याचे आपल्याला समजते. विवाह निश्चित करताना ग्लॅमर नाही, तर ग्रामर महत्वाचं असतं; केवळ दिखाऊपणा, आभास नाही तर अभ्यास महत्वाचा ठरतो. तिथेदेखील सुरुवातीचा आभास कितीही प्रभाव निर्माण करणारा असला, तरीही कालांतराने प्रभावापेक्षा मूळ स्वभाव आणि एकूणच अभ्यासातील अभाव दिसून येऊ लागतो.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

सुरुवातीला चमकणारे सोने कालांतराने तांबे असल्याचे कळले कि अभ्यासाचा अभास केल्याचे पितळ उघडे पडते. पवित्र मानल्या जाणाऱ्या, विवाहाच्या संस्कारांतून निर्माण होणाऱ्या नात्यासाठी काहीवेळा वधू-वर यांच्या निवडीत देखील अभ्यासाचा अभाव असल्याचे दिसून येते. संपूर्ण आयुष्य सहजीवनाच्या मार्गाने व्यतीत करायचे असते, हे सर्वज्ञात असूनही अवघ्या काही तासांत विवाह निश्चित केले जातात. काहीवेळा अभ्यासाचा अभाव, तर काहीवेळा अभास असल्याचे कळते पण वळत नाही. आपल्या प्रत्येक विचार, वर्तन आणि व्यवहारांत आभासी दुनियेचे आकर्षण फार नसावे कारण नेहेमी अभ्यासच महत्वाचा ठरत असतो. कल्पक आणि सौंदर्यपूर्ण सकारात्मक विचार, आचार आणि व्यवहार करणारे मन निश्चितच आपल्या जीवनात सौदर्याचा साक्षात्कार घडवून आणू शकते.



आधुनिक केसरी

## हरिनामावीना | मुक्ती नाही ||

ज्याचे त्याचे कर्म | देते त्यास फळ ||
उगा तू वाचाळ | त्रागा करी ||१||

वैतागून काय | साधशील वेड्या ||
विकारांच्या बेड्या | तोड आधी ||२||

तझी सोडवण | अन्य कोण करी ||
तुझा तूचि वैरी | आज झाला ||३||

ठायी ठायी ठाव | घेते ही विठाई ||
सत्कर्माची घाई | टाळू नको ||४||

ज्ञाना-तुका सांगे | ऐक माझ्या मना ||
हरिनामावीना | मुक्ती नाही ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## "निरुपण"

आधुनिक केसरी


**स्तुवन्तिये स्तुतिभिरमूभिरन्वहं**
**त्रयीमयीं त्रिभुवनमातरं रमाम् ।**
**गुणाधिकागुरुतरभाग्यभागिनो**
**भवन्तिते भुविबुधभाविताशयाः ॥१८॥**

जे लोक या स्तुतींद्वारे प्रतिदिन वेदत्रयीस्वरूपा त्रिभुवनजननी भगवती लक्ष्मीचे स्तवन करतात, ते या भूतलावर महान गुणवान आणि अत्यंत सौभाग्यशाली होतात. तथा विद्वान माणसेही त्यांचे मनोभाव जाणण्यासाठी उत्सुक असतात.



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## || दासबोध स्तवन ||



# द्रुष्यनिरसन

आधुनिक केसरी

परमेश्वराने माणसाची निर्मिती करताना माणसाच्या इंद्रियांच्या रचना एक सारख्या केल्या आहेत. तिथे त्याने दुजाभाव केलेला नाही. ऊदा,नाकाचा उपयोग श्वास घेण्यासाठी, कानाचा उपयोग ऐकण्यासाठी तसेच शरीरांतर्गत असलेल्या प्रत्येक अवयवांचा उपयोग एकसारखा होतो. हे आपल्याला माहिती आहे. असं कुणीही म्हणणार नाही की मी शरीरातील उष्णता कमी जास्त करू शकतो. तसं होत नाही कारण ईश्वराने सर्वांना समान शरीर रचना दिलेली आहे.



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

माणसाचे मन अर्थ समजते. पण मनाचे रूप जसे बदलत जाते तसा त्याच वस्तुचा अर्थ समजण्यास फरक पडतो. उदा,लहान बालकाला आईचा अर्थ कळतो. वयात आलेल्या मुलीला आईसमजते.पण जेव्हा ती मुलगी स्वतः जबाबदार आई होते तेव्हापासून तिच्या आईपणाचा निराळाच अर्थ समजतो.मनाचे स्वरूप जर संपूर्ण बद लून टाकले तर वस्तूचा नवा अर्थ समजतो मगया नव्या अर्थाच्या द्रुष्टीने जुना अर्थ खोटा भ्रम किंवा भास होता असे वाटते. संत कुणाला म्हणायचे? तर जो पुरूष साधनाने आपली मनोरचना अमुलाग्र बदलून टाकतौ तो संत होय. **(क्रमशः)**

# एकटेपणाची गंभीर समस्या

आधुनिक केसरी

वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन (WHO) नुसार, भारतात 200 दशलक्षाहून अधिक लोक नैराश्य आणि इतर मानसिक आजारांनी ग्रस्त आहेत. एका अहवालानुसार, भारतात काम करणा-या कर्मचार्‍यांपैकी सुमारे ४२ टक्के कर्मचारी नैराश्य आणि चिंताग्रस्त आहेत. भारतासह संपूर्ण जगासाठी नैराश्य आणि एकटेपणा ही एक मोठी समस्या बनली असून केवळ समाजाची जबाबदारी म्हणून त्याकडे दुर्लक्ष करता येणार नाही.
एकटेपणाने वेढलेला माणूस स्वतःच्या विनाशाचे कारण बनतो, तो जीवनाचा विचार करण्याऐवजी मृत्यूचा विचार करू लागतो. डॉक्टरांना त्याचे औषध विचारण्याऐवजी तो त्याच्या मृत्यूची तारीख विचारू लागतो. या आजाराचे गांभीर्य आणि त्यामुळे होणारा त्रास हे स्वतः याला बळी पडलेल्या व्यक्तीलाच समजू शकते. जागतिक आरोग्य संघटनेच्या मते, आत्महत्या हे जगभरातील तरुण लोकांच्या मृत्यूचे तिसरे प्रमुख कारण आहे आणि एकटेपणा हे याचे सर्वात मोठे कारण आहे. एकटेपणा हा एकच शब्द असला तरी लोक ते गांभीर्याने घेत नाहीत, पण अलीकडची परिस्थिती पाहता जगभरातील देश आणि सरकारे आता गांभीर्याने घेऊ लागले आहेत.
एकटेपणाचा बळी फक्त तेच लोक असतात जे समाजात एकटे राहतात असे नाही तर काहीवेळा बळी ते देखील असतात जे संपूर्ण कुटुंब, नातेवाईक आणि मित्रांनी वेढलेले असतात आणि तरीही एकटेपणा जाणवतात. एकटेपणाने ग्रासलेली व्यक्ती आपल्या जीवनाचा उद्देशही विसरते. त्याच्याकडे कोणतेही ध्येय नाही किंवा काहीही साध्य करण्याची इच्छा नाही, तो समाज आणि कुटुंबापासून दूर जातो.
अशा व्यक्तींना सावरण्याची इच्छाही नसते कारण ते जीवनाला पूर्णपणे कंटाळलेले असतात. अहवालात असे दिसून आले आहे की एकटेपणाची समस्या अविवाहितांपेक्षा विवाहित लोकांमध्ये 60 टक्के जास्त आहे. हार्वर्ड बिझनेस रिव्ह्यूच्या संशोधनानुसार, एकाकीपणामुळे माणसाचे वय लवकर वाढते आणि ते दिवसाला १५ सिगारेट ओढण्याइतके धोकादायक असते. मोठ्या समस्या आणि संकटांनी वेढलेले लोक अनेकदा एकाकीपणाचे बळी ठरतात, मोठ्या महामारी आणि युद्धांच्या काळात लोकांच्या जीवनात एकटेपणाची असुरक्षितता वाढते. कोरोनाच्या काळात आणि विशेषतः लॉकडाऊनच्या काळात हा एकटेपणा सर्वांनाच जाणवला आहे. या काळात लोकांच्या वागण्यात अनेक बदल झाले. त्यांच्यात राग, निराशा आणि घुसमट वाढली. या भावना माणसाला एकाकीपणाच्या अंधारात ढकलतात. एकटेपणा आणि एकटेपणा यात खूप फरक आहे. एकाकीपणा ही मनाची अवस्था आहे, ज्याला आपण मानसिक आजार असे नाव देऊ शकतो, तर एकटेपणा ही व्यक्तीच्या आध्यात्मिक विकासाची अवस्था आहे. आपले ऋषी-मुनी एकांतात साधना करून आपला आध्यात्मिक विकास करत असत. महान लेखक, कलाकार, लेखक, पत्रकार आणि शास्त्रज्ञ त्यांच्या सर्जनशील कार्यासाठी एकटेपणा शोधतात, म्हणजेच निर्मितीसाठी एकटेपणा आवश्यक असतो, परंतु एकाकीपणामुळे विनाश होतो.
अलीकडेच जपानने एकाकीपणावर मात करण्यासाठी मंत्रालयाची स्थापना केली आहे, ज्याचे नाव आहे 'एकटेपणाचे मंत्रालय'. जपानी लोक हे कष्टाळू आणि कामाबद्दल प्रामाणिक मानले जात असले तरी एकटेपणा त्यांना आतून पोकळ बनवत आहे. जपानची लोकसंख्या साडेबारा दशलक्ष आहे, त्यापैकी सुमारे 63 दशलक्ष वृद्ध आणि 60 दशलक्षाहून अधिक तरुण आहेत. म्हणजेच एकूण लोकसंख्येपैकी 5 टक्के वृद्ध आणि 50 टक्के तरुण आहेत. हे वडील जपानसाठी चिंतेचा विषय आहेत, कारण त्यांच्या एकटेपणावर मात करण्यासाठी त्यांना कोणीही साथीदार नाही.
लोक त्यांच्या एकटेपणावर मात करण्यासाठी रोबोट कुत्रे आणि रोबोट मित्रांचा सहारा घेतात, परंतु त्यांना कोणताही जिवंत साथीदार दिला जात नाही. 2020 मध्ये 2019 च्या तुलनेत आत्महत्येचा आकडा सुमारे 4 टक्क्यांनी वाढला, म्हणजेच प्रत्येक एक लाख नागरिकांमागे 16 नागरिकांनी आत्महत्या केल्या आणि तपासात असे आढळून आले की, यामागे एकटेपणा हे सर्वात मोठे कारण आहे. तेथील सरकारने हे मंत्रालय नेमले. एकटेपणाची लक्षणे ओळखण्यासाठी हे मंत्रालय शाळा-कॉलेज, क्लब आणि मंत्रालयांसोबत काम करेल आणि त्यानंतर एकटेपणाची समस्या सोडवण्यासाठी योजना तयार केली जाईल. 2018 मध्ये, यूकेनेही असे मंत्रालय तयार केले. त्यामुळे आता वेळ आली आहे की जपानमध्ये बनवल्याप्रमाणे भारतातही एकटेपणासाठी मंत्रालय बनवायला हवे, कारण आत्महत्येसारखी गंभीर समस्या आता महामारीचे रूप धारण करत आहे, जी देशात तसेच जगभरात पसरत आहे.
एकटेपणाला दूर करणे आवश्यक आहे अन्यथा मानसिक संतुलन बिघडण्याची शक्यता असते.एकटेपणा दूर करण्यासाठी ण्या करता मित्रांशी बोला,अगदी सहज करता येणारी गोष्ट म्हणजे घरातून बाहेर पडा, अगदी सहज एखादी छोटीशी गोष्ट विकत घेण्याकरता दुकानात जाऊन या त्या वस्तूविषयी शॉप कीपरकडे अगदी उगीचच चौकशी करा आणि घ्या विकत ती वस्तू.



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

व्यायाम करा,दररोज सकाळी फिरवला जा, वाचनाचा छंद बाळगा,संगीत ऐका, अधूनमधून चित्रपट बघा, ऐतिहासिक स्थळांना भेटी द्या,तुम्हाला आवडणारी लहान लहान रोपं आणून कुंड्यांमध्ये लावा. सकाळ संध्याकाळ त्यांना न चुकता आठवणीने पाणी घालत जा, त्यांना वेळोवेळी आवश्यक ती खतं घाला आणि मग बघा किती छान सोबत करतात ते तुम्हाला! अगदी घरातील एखाद्या सजीव सदस्यासारखी. स्वतःला घरकामात व्यस्त ठेवा, एकट फिरायला निघायचं? नाही, स्वतःसोबत फिरायला जायचं. हे सर्व करत असताना सोशल मीडियाचा वापर टाळा, एखादा छंद बाळगा, आपल्या मनात आलेल्या विचारांना कागदावर उतरवून आपण लिखाणाला देखील सुरुवात करणं चांगलं ठरू शकतं. एकाकीपण दूर करण्याचं ते एक प्रभावी माध्यम आहे. एकाकीपणाची जास्तच भीती वाटू लागल्यास एखाद्या उत्तम तज्ञाची मदत घ्या. त्यामुळे एकाकीपणा दूर करण्यास त्यांनी दिलेल्या सल्ल्याचा आपल्याला जास्त लाभ मिळू शकतो.

# शाहीर समाजाचा आरसा : परंतु लोककला जोपासणारे शाहीर उपेक्षितच



आधुनिक केसरी

आपली लोककला आणि शाहिरीचे वर्षानुवर्षे जतन व संवर्धन करून आपल्या शाहिरीद्वारे सामाजिक चिंतन घडवणारे सर्व शाहीर समाजाचा आरसा झाले परंतू याच शाहीर व लोककलावंतांच्या वाटेला आजही उपेक्षाच आल्याची खंत महाराष्ट्राचे लोकप्रिय शाहीर अप्पासाहेब उगले यांनी आधुनिक केसरीशी संवाद साधत व्यक्त केली. पारंपरिक तमाशा, गोंधळ ,वाघ्या मुरळी, भेदिक शाहिरी, लावणी,पोतराज, वासुदेव, भारुड या लोककलांचे अभ्यासक, मार्गदर्शक व सादरकर्ते शाहीर आप्पासाहेब उगले जालना येथून एका कार्यक्रमास औरंगाबादला आले असता आधुनिक केसरीशी खास संवाद साधताना बोलत होते.




ते सांगतात माझे चौथीपर्यंत शिक्षण झाले. वडिलांचा गोंधळ जागरण करण्याचा व्यवसाय होता. आम्ही गोंधळी असल्याने मी वयाच्या बाराव्या वर्षीच लोककलेच्या क्षेत्रात आलो. पिढीजात व्यवसाय असल्याने या लोककला अवगत करायला वेळ लागला नाही. 1985 साली महाराष्ट्र शासनाच्या तमाशा प्रशिक्षणामध्ये लातूरला एक महिना राहिलो. प्रशिक्षणानंतर हरिभाऊ बडे नगरकर, आप्पासाहेब डोंगरे परळीकर, भिकाभिमा सांगवीकर या प्रसिद्ध तमाशात मी काम केले. पुढे स्वतःचा तमाशा पण उभा केला. 20 ते 25 कलाकारांना सोबत घेऊन गावोगावी जाऊन गोंधळ, देवीचे भक्ती गीते, लोकगीते,भावगीते, गवळणी भजन भारुड, छोटे मोठे विनोद सादर करीत मी नावारूपास आलो. आणि 1986- 87 साली मुंबई आकाशवाणीच्या व्यासपीठावर वसंत बापटांच्या उपस्थितीत मला शाहीर पदवी बहाल करण्यात आली.

मी अनेक नामवंत कलाकारासमवेत वानदेशी मन, खानदेशी गवळण, बालेघाटी लावणी सादर करीत गेलो. पुढे शासनाचे साक्षरता अभियान, सर्व शिक्षा अभियान ,स्वच्छता अभियान, जलस्वराज्य उपक्रम, कुटुंबकल्याण, स्त्रीभ्रूणहत्या आणि शासकीय उपक्रमात कामे केली आणि सध्या करीत आहे. लोककलावंत आणि शाहिरांकडे पाच मिनिटात इतिहास उभा करण्याची ताकद आहे. ही ताकद वैशिष्ट्यपूर्ण आहे. लोकांना पेटवण्याचे काम शाहीरांनीच केली. शासन स्तरावर खऱ्या पारंपारिक कलावंतांना डावले जात आहे. त्यांना तुटपुंजे मानधन दिले जात हे वेदनादायी आहे. आजही अनेक शाहीर आणि लोककलावंत उद्याचे काय? ही विवांचना घेऊन जगत आहेत. समाज आणि शासनाने या सर्व कलावंतांना आधार देण्याची गरज असून आपल्या लोककला आणि शाहिरीचे वर्षानुवर्ष संवर्धन करून आपल्या शाहिरीद्वारे सामाजिक चिंतन घडवणारे सर्व शाहीर समाजाचा आरसा झाले परंतु लोककला जोपासणारे शाहीर आजही उपेक्षितच राहिल्याची खंत शाहीर अप्पासाहेब उगले यांनी व्यक्त केली.

## मुलांची भरारी सुखावह ठरतेय

माझी मुले कल्याण आणि रामानंद यांनी महाराष्ट्राची लोककला जीवापाड जपत या कलेला लोकाश्रय देण्यासाठी त्यांची चाललेली तळमळ माझ्यासाठी सुखावह ठरते आहे. या मुलांचा बाप म्हणून आणि एक सच्चा मार्गदर्शक म्हणून मी दोघांच्या पाठीवर नेहमीच शाबासकीची थाप ठेवत आलो आहे. ते आपल्या लोककलेचे करीत असलेले कार्य आणि त्यात त्यांचा रमलेला जीव याप्रसंगी मला खूप मोलाचा वाटतोय असे शाहीर अप्पासाहेब उगले सांगतात.

# भारताच्या स्वत्व जागृतीसाठी संघ कटिबद्ध

## डॉ. मनमोहन वैद्य यांनी दिली अखिल भारतीय समन्वय बैठकीची माहिती

आधुनिक केसरी न्यूज

**रायपूर :** येथे झालेल्या तीन दिवसीय अखिल भारतीय समन्वय बैठक 2022 ची माहिती सह सरकार्यवाह डॉ. मनमोहन वैद्य यांनी पत्रकारांना दिली. ते म्हणाले की, भारताच्या स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त संघप्रेरित सगळ्याच विविध संघटनांनी देशाचे स्वत्व जागृत करण्याच्या कार्याला विस्तार देण्याबाबत चर्चा केली. त्यांनी सांगितले की, बैठकीत ग्राहक पंचायतीने स्थानिक वस्तूंना प्रोत्साहन देण्यासाठी विकेंद्रीत अर्थव्यवस्थेवर भर देण्याचा मुद्दा मांडला, तर स्वदेशी जागरण मंचाने भारतीय अर्थव्यवस्थेचे मोजमाप करण्यासाठी केवळ जीडीपी हे प्रमाण न मानता एक नवीन मोजमाप प्रणाली बनविण्याचा विचार मांडला. त्याच इसी प्रकारे भारतीय किसान संघाने जैविक कृषीला प्रोत्साहन देण्याबाबत विचार मांडले. भारतात केवळ शारीरिक रोगांच्या उपचाराचा विषय नाही आहे. भारतीय उपचार प्रणालीसुद्धा परिष्कृत आणि प्रगत आहे. वर्तमान परिस्थितीत आरोग्य भारतीने संपूर्ण उपचार पद्धतीचा अंगीकार करण्याचा विचार मांडला व त्यावर कार्य करण्याबाबत आपले मत मांडले. देशात स्वभाषेला प्रशासनात सन्मान करण्यासाठी न्यायपालिकेच्या कार्यप्रणालीत भारतीय भाषेचा वापर करण्याबाबत विचार झाला. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सह सरकार्यवाह डॉ. मनमोहन वैद्य म्हणाले, की देश-परदेशात संघकार्य वाढत आहे. कोविड संक्रमणाच्या थोडा कमजोर झाला होता. आता पुन्हा शाखांमध्ये वाढ झाली आहे. ते म्हणाले, की राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने प्रेरित झालेल्या 36 संघटना समाजात कार्य करत आहेत. त्या सगळ्या स्वायत्त आणि स्वतंत्र आहेत. त्यामुळे या समन्वय बैठकीत कोणताही निर्णय होत नाही, वेगवेगळ्या विषयांवर चर्चा होते. ते पुढे म्हणाले, की स्वातंत्र्याची 75 वर्षे पूर्ण झाले आहेत. या उत्सवात संघाच्या निरनिराळ्या संघटनांनी आपले योगदान दिले आहे. शैक्षणिक महासंघाच्या 2 लाख विद्यार्थ्यांनी कार्यक्रम केला. संस्कार




भारतीने वंदे मातरम् गायन केले. संपूर्ण देशात 75 नाटकांचे मंचन झाले. अशा प्रकारे अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने 87 हजारांपेक्षा अधिक ठिकाणी तिरंगा फडकावला. ते म्हणाले, की स्वातंत्र्यसंग्रामात संपूर्ण देशाच्या सर्व भागांतील, सर्व वर्गांचा सहभाग राहिला आहे. भारताचा स्व, स्वातंत्र्य, स्वदेशी, स्वराज यात एक समान शब्द आहे. समन्वय बैठकीत सर्वांना जोडणाऱ्या स्वला प्रगट करण्याबाबत चर्चा झाली. भारताचे तत्त्व आध्यात्मिकता आहे. याच्यावर आधारित जीवनपद्धतीने सर्वांच्या जीवनाला प्रभावित केले आहे. ईश्वर एक आहे, मार्ग वेगवेगळे आहेत. सर्वांचे सत्य स्वीकार्य आहे. भारतात एक संस्कृती आगे ती विविधतेचा उत्सव साजरा करते. त्यांनी सांगितले की, रवींद्रनाथ टागोर म्हणाले होते, राजा, सत्तेकडे संपूर्ण व्यवस्थेची जबाबदारी नव्हती. केवळ सेना, परदेश नीती, प्रशासन ही राजाची जबाबदारी होती. बाकीच्या कार्याची जबाबदारी समाज पार पाडत होता. समाजाचे हे तत्त्व आपण कोविड काळातही पाहिले आहे. लाखो लोकांनी बाहेर निघून मिळून काम केले. अशाच प्रकारे भारतात भौतिक समृद्धी आणि आध्यात्मिक प्रगती एकत्र साधणे हेच जीवन आहे. वरील तिन्ही मिळून भारताचे स्वत्व कसे प्रगट होईल, यावरही चर्चा झाली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या अखिल भारतीय समन्वय बैठक 2022 चे आयोजन करण्यात आले. यात संघ विचारांशी जोडलेले 36 संघटनांचे 240 पेक्षा अधिक प्रमुख प्रतिनिधींनी भाग घेतला. या बैठकीत पूजनीय सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत, सरकार्यवाह दत्तात्रेय होसबाले यांचे मार्गदर्शन लाभले.

# पुसद येथे दोन दुचाकी जाळल्या

आधुनिक केसरी न्यूज

**पुसद :** शहराला लागून असलेल्या काकडदाती ग्रामपंचायतीच्या हद्दीतील मधुसूदन नगरमध्ये रविवारी सकाळी ३:०० ते३:१५ वाजल्याच्या सुमारास अज्ञात माथेफिरूने दोन दुचाकीचीवर कपडा टाकून जाळल्या. याबाबत प्राप्त माहिती अशी की, शहराला लागून असलेल्या काकडदाती ग्रामपंचायतीच्या हद्दीतील मधुसूदन नगरमध्ये रहिवासी असलेले प्रदीप मारोती नरवाडे यांच्या अंगनात नेहमीप्रमाणे मालकीच्या दुचाकी हीरो फॅशन प्रो क्रमांक एमएच. २९ ए. व्ही. २३६३ किंमत अंदाजे ५९४३५ रुपये, दुसरीचा की होंडा एक्टिवा क्रमांक एमएच.२६- ए. व्ही. ९६९१ किंमत अंदाजे ४२ हजार रुपये उभ्या करून रात्री झोपी गेले असताना रविवारी सकाळच्या सुमारास अंदाजे ३:००ते३:१५ वाजल्याच्या सुमारास कोणीतरी अज्ञात माथेफिरूने त्या दुचाकी वर कपडा टाकून पेटवून दिल्या ही घटना कळण्या आधिच दोन्ही दुचाकी आगीच्या भक्षस्थानी पडल्या.



त्यामुळे नरवाडे परिवाराचे अंदाजे एक लाख रुपयांच्या जवळपास या घटनेमुळे नुकसान झाले आहे याबाबत शहर पोलीस स्टेशन येथे तक्रार दाखल केली असून पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. सदर घटनेचा तपास शहर पोलीस करीत आहेत. अशा घटनाला आळा घालण्यासाठी आता पोलिसांसमोर तपासाचे आव्हान आहे. तसेच रात्रीची गस्त अधिक कडक करून आशा माथेफिरूचा बंदोबस्त करावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या घटनेमुळे परिसरातील रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# कन्नड तालुका फोटोग्राफर संघटनेचे चर्चासत्र व मार्गदर्शन

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुका फोटोग्राफर संघटनेकडून तेलवाड़ी आश्रम कन्नड यथे चर्चासत्र व मार्गदर्शन सोहळ्याच अयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी कन्नड फोटोग्राफर असोशियनचे संस्थापक अध्यक्ष कन्नड चे प्रसिद्ध फोटोग्राफर मुस्ताफा हुसेन व भावसाहेब पवार हे होते कार्यक्रमाचे उदघाटक म्हणुण औरंगाबादचे प्रसिद्ध (चाईल्ड फोटोग्राफर निलेश कुलकर्णी हे होते प्रमुख पाहुणे म्हणून पुणे येथेली प्रसिद्ध मॉडलींग फोटोग्राफर म्हणून स्वप्नील पाटिल हे होते तर प्रमुख वक्ते म्हणुन प्राईड ग्रुप एज्युकेशनचे सतीश शर्मा महिला फोटोग्राफर कुमारी सुकन्या हिवडे हे होते. कार्यक्रमाच्या प्रमुख उदघाटक निलेश कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले त्यानी चाइल्ड फोटोग्राफी विषय माहिती दिली नंतर. स्वप्नील पाटिल यानी मॉडलिंग फोटोग्राफी विषयी मार्गदर्शन केले. सतिष शर्मा यांनी मारकेटिंग विषय चर्चा केली. व महिला फोटोग्राफर कु सुकन्या हिवाडे यांनी आपले अनुभव फोटॉग्राफी विषयी वेगवेगळे अनेक किस्से सांगीतले या कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी कन्नड तालुका फोटोग्राफर असोशियनचे अध्यक्ष दिलीप केवट व उपाध्यक्ष- विलास शिन्दे व शहर अध्यक्ष संदिप निकम तसे पिशोर सर्कल फोटोग्राफर असोशियन चे अध्यक्ष कैलास निकम उपाध्यक्ष राजपूत यांनी सुत्र सूत्रसंचालन केले व संदिप शिंदे यांनी प्रस्ताविक केले. यावेळी नितिन लोंढे, श्रीकृष्ण बड़ग,पदम आन्दोरे , अनिल अव्हाड, अमोल चव्हाण, नितीन दराडे , अविनाश ठेगडे, प्रशांत वाघ, लक्की पैठणे. हेमंत गर्गे, सचिन पवार ,किशोर खरात,महेंद्र काशिन्दे मुकेश राजपुत, भावलाल राठोड. लक्ष्मण राठोड संदिप बोरशे, देविंद सोनवणे , किशोर प्रधान ज्ञानेश्वर मोरे ,कृष्ण डहाके पप्पु वरकड दीपम आन्दोरे, नरेश भाड़ाइत राजेन्द्र सोनवणे भाऊसाहेब सोनवणे यानी परिश्रम घेतले.



# लम्पी स्किन आजाराने बैल दगवला

## नुकसान भरपाई द्यावी : मा. सभापती धरमसिंग चव्हाण

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील नादातांडा येथे गेल्या काही दिवशात देशात गुरांमधे लम्पी व्हायरसच्या संसार्गासारखी लक्षणे आढळून येत आहे. त्यात औरंगाबाद जिल्ह्यातील सोयगाव तालुक्यात नादातांडा येथे दि.१०/९/२२ रोजी अल्पभूधारक शेतकरी संतोष मोहन राठोड यांच्या बैला झाली होती लम्पी स्क्रीन रोगाची लागण झाल्याने बैल दगवला.

मा.सभापती धरमसिंग चव्हाण यांनी दि.८/९/२२ रोजी बातमी प्रकाशित केली होती. की लम्पी स्क्रीन रोगाचा प्रादुर्भाव जनावरांना झाला आहे आपल्या परिसरात लागण सुरुवात पण झाली आहे. अशी बातमी दै.आधुनिक केसरी मधे प्रकाशित केली होती या बातमीची दखल घेऊन लसीकरण कॅम्प नादातांडा येथे होणार आहे. परंतु ज्या ज्या जनावरांमधे लम्पी स्क्रीन सदृशय रोगाचे लक्षण दिसत असल्यास त्या जनावरांना इतर जनावरांशी संपर्क येवू न देता योग्य काळजी घेऊन जनावरांचे लसीकरण



करून घ्यावे अशे आवाहन मा.सभापती धरमसिंग चव्हाण यांनी केले होते. पण संबंधित पशु विभागाने व पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. चव्हाण या बातमीची दखल घेतली आणि लवकरच एक ते दोन दिवसात नादातांडा जनावरांच्या लसीकरण कॅम्प घेतला जाईल अशी बैठक. सावळदबारा ग्रामपंचायत कार्यालयात घेण्यात आली. आणि फ्रि मधे लसीकरण होईल अशी ग्वाही दिली.सावळदबारा परिसरात जनावरांना लसीकरण होणार आहे.शेतकरी संतोष राठोड यांनी गुरांचा बाजारातून ऐंशी हजाराची बैलाची जोडी ऊसतोडी कामासाठी विकत घेतली होती. त्यापैकी एक बैला लम्पी स्क्रीन रोगाचा व्हायरस झाल्याने वेळेवर उपचार व लसीकरण पशुवैद्यकीय अधिकारी डॉ नसल्याने मोहन राठोड याचां बैल दगावला आहे. परिसरात लम्पी स्क्रीन रोगाची जोरात साथ चालू आहे आणि पशुविभागाने नादातांडा येथे येऊन चौकशी केली असता त्यांना तीन ते चार जनावरे लम्पी स्क्रीन रोग आढळून येताना दिसला आहे.ऊसतोडीच्या कामगार संतोष राठोड यानां पशूविभागाकडून तात्काळ नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी सोयगाव पंचायत समितीचे मा.सभापती धरमसिंग चव्हाण यांनी केली आहे.

# विद्यार्थ्यांनी आपले अस्तित्व बनवून कर्तृत्ववान व्हावे : मोनाली सोनवणे

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** कै . सुरेश केवट यांच्या चतुर्थ पुण्यस्मरण निमित्त अभिवादन तथा जिल्हास्तरीय चित्रकला स्पर्धा तसेच शाडूच्या मातीच्या घरघुती गणपती बाप्पा सजावट स्पर्धा २०२१ चे बक्षीस वितरण कार्यक्रमा घेण्यात आला

कन्नड तालुका पत्रकार संघच्या वतीने घेण्यात आलेल्या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून माजी नगराध्यक्ष संतोष कोल्हे, जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सागर जाधव, साने गुरुजी चे अध्यक्ष डॉ. मिलिंद पाटील,डॉ. रुपेश मोरे,उद्योजक भरत चौधरी नगरसेवक रत्नाकर पंडित,अनिल गायकवाड,असलम पटेल यांची उपस्थिती होती.दोन गटात घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय चित्रकला स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांचा उस्फुर्त प्रतिसाद मिळाला. तब्बल चारशेपेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.प्राथमिक गटासाठी गोष्ट सांगणारी आजीबाई आणि गडावरची सहल तर माध्यमिक गटासाठी कन्नड तालुका



जिल्ह्यातील ऐतिहासिक वारसा आणि गणपती विसर्जन असे विषय देण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी सुबक चित्रे काढून आपल्यातली कला कागदावर उमटविली.

यावेळी संतोष कोल्हे, सागर जाधव,मोनाली सोनवणे, सागर पाटील, साईनाथ करवंदे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमासाठी सेवानिवृत्त प्राचार्य अरविंद कांबळे, आर.एस. पवार, सतीश शर्मा, माजी सरपंच नितीन सुसलादे, उद्योजक किशोर क्षीरसागर यांची विशेष उपस्थिती होती .

# अजितदादांची फटकेबाजी

आधुनिक केसरी

पैठण येथील सभेला गर्दी जमवण्याकरीता अंगणवाडी सेविकांना, मदतनीस, पर्यवेक्षिकांना उपस्थित राहण्याचे पत्र काढावे लागते ही वेळ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर आली असेल तर ते महाराष्ट्राचे दुर्दैव आहे अशा शब्दात विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी पत्रकार परिषदेत मुख्यमंत्र्यांवर हल्लाबोल केला. पैठण येथील मुख्यमंत्र्यांच्या सभेला येण्यासाठी महिला व बालकल्याण विभागाच्यावतीने अंगणवाडीसेविका, मदतनीस व पर्यवेक्षिकांना लेखी स्वरूपात पत्र काढत आदेश दिला जातो याबाबत नाराजी व्यक्त करत संबंधित विभागाचे पत्रच अजित पवार यांनी पत्रकार परिषदेत दाखवले.मंत्र्यांच्या निर्देशाशिवाय अधिकारी आदेश काढू शकत नाहीत असेही अजित पवार यांनी स्पष्ट केले. हिवाळी अधिवेशनापर्यंत उर्वरित मंत्रीमंडळाचा विस्तार होण्याची शक्यता कमी आहे. आमदारांची नाराजी वाढेल. पालकमंत्री नेमलेले नाहीत. पालकमंत्र्यांच्या यादीत इच्छूकांची संख्या जास्त असल्याने या नेमणूका रखडल्या आहेत. राज्यावर अनेक संकटे येत आहेत. नुकतीच अतिवृष्टी आणि आता ढगफुटी झाली. धरणाचे पाणी सोडले जात आहे. त्यामुळे त्याखालील गावांना पुराचा धोका निर्माण झाला आहे याकडे लक्ष द्यायला कोण आहे. कुणावरतरी जबाबदारी नेमायला हवी होती. स्वातंत्र्यदिनी २० लोकांना झेंडावंदन करता आले इतर १६ ठिकाणी प्रशासकीय अधिकाऱ्यांनी झेंडावंदन केले हे लोकशाहीमध्ये मान्य होणारी गोष्ट नाही. कारण लोकांनी निवडून दिलेल्या लोकांना नेमा परंतु जो काही कारभार सुरू आहे त्या कारभाराचा धिक्कार व निषेध अजित पवार यांनी यावेळी केला. दिल्लीमध्ये दोन दिवसाचे पक्षाचे राष्ट्रीय अधिवेशन पार पडले. त्यामध्ये राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय पवारसाहेबांनी मार्गदर्शन केले. शिवाय इतर मान्यवरांनीही आपले विचार मांडले. आमच्या राज्याच्यावतीने आमचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी राज्याची भूमिका मांडली. या राष्ट्रीय अधिवेशनात राष्ट्रीय नेते व प्रदेशाध्यक्ष यांनी बोलणं अपेक्षित असतं त्यामुळे मी बोलणं टाळलं असे स्पष्ट करतानाच माध्यमांनी नेहमीप्रमाणे वेगळा अर्थ काढला. वास्तविक मला तिथे कुणी बोलू नका असं सांगितलं नाही. मीच माझी भूमिका त्याठिकाणी घेतली. मी एकटाच बोललो नाही असं नाही तर वेळेअभावी सुनील तटकरे, खासदार वंदना चव्हाण बोलू शकले नाहीत. दोनवेळा वॉशरुमला गेलो म्हणून वेगळा विषय चालवण्यात आला. कारण नसताना गैरसमज पसरवण्याचा प्रयत्न झाला. वस्तुस्थिती आधारित बातम्या देण्याची जबाबदारी माध्यमांची आहे मी राज्यात गेल्यावर माध्यमांसमोर बोलणार आहे असेही सांगितले होते. १९९१ ला खासदार झालो म्हणजे ३१ वर्षे झाली तेव्हापासून सहसा मी राष्ट्रीय पातळीवर उपस्थित राहतो परंतु मी मार्गदर्शन करत नाही राज्यात सभा, अधिवेशनात मी बोलतो माझी भूमिका स्पष्ट करतो. त्यामुळे तुमचे गैरसमज दूर करुन राज्यासमोरचे सध्याचे प्रश्न व राज्यसरकारची चुकीचे धोरणं मांडण्यासाठी ही पत्रकार परिषद असल्याचे अजित पवार यांनी सांगितले. राज्यासमोर अनेक गंभीर प्रश्न असताना आणि गणेशोत्सव उत्साहात साजरा झाला असताना ठाकरे व शिंदे गटात हाणामारी झाल्याचे समजले. कुणीपण उठतो आणि रिव्हॉल्व्हर काढतो... हे काय बिहार - युपी आहे का? असा सवाल करतानाच मला या राज्यांची बदनामी करायची नाही. नाहीतर म्हणतील या राज्याची बदनामी करतोय परंतु एका सत्ताधारी पक्षाचा आमदार असं करायला लागला तर राज्यात कायदा व सुव्यवस्था आहे की नाही? गृहमंत्री काय करत आहेत? पुरोगामी महाराष्ट्राला हे शोभणारे नाही.राज्याच्या हिताचे नाही असे खडेबोलही अजित पवार यांनी सुनावले.

# आंदोलने,नेते.. यशाचे रहस्य..



डॉ. विजय पांढरीपांडे
मो. 7659084555

आधुनिक केसरी

**आंदोलनाचा उद्देशच जुने त्यागून काळाला सुसंगत नव्याचा स्वीकार असे असते. कोणताही समाज, कोणतेही सरकार, कोणतेही व्यवस्थापन अशा क्रांतिकारी बदलाला सहसा तयार नसते. त्यामुळे समाजात जो असंतोष आहे, असमाधान आहे त्यामागची कारण परंपरा शोधून, नेमके काय बदल हवे आहेत, ते कसे करायचे, कुणी करायचे याचा स्पष्ट आराखडा नेत्याकडे असणे गरजेचे. म्हणजे त्या सर्व अंगाचा, परिणामाचा अभ्यास हवा.ने आहे ते नको, ते बदलायचे, तर त्याजागी काय हवे, हे अपेक्षित बदल कसे घडवून आणायचे हे समाधान, सोलुषन नेत्याकडे हवे. बदल एकांगी करता येत नाही. सर्व सहमतीनेच बदल घडविता येतात. म्हणजे तुमचे मुद्दे सर्व संबंधितांना पटवून देता आले पाहिजेत. जे जसे चालले आहे ते तसे यापुढे चालणार नाही असे समजावून, ठणकावून सांगता आले पाहिजे. जी समस्या आहे ती कुणा एकट्याची नाही, ती अनेकाशी किंवा बहुसंख्यांक लोकाशी निगडित आहे हे पटवून देता आले पाहिजे.**

सामजिक प्रश्नांवरून सर्वच देशात अनेक चळवळी,आंदोलने होतात. त्यातील काही यशस्वी होतात. तर काही अयशस्वी.. म्हणजे फुसका बार! या यशापयशाची कारण मीमांसा नेमकी काय असते? कोणते मुद्दे, कोणते गुणधर्म आंदोलने यशस्वी करतात? स्वातंत्र्यपूर्व काळात सगळी आंदोलने, चळवळी या गुलामी विरोधात, इंग्रज राज्य कर्त्याच्या विरोधात होत्या.मार्ग (जहाल, मवाळ), वेगळे असले तरी प्रत्येकाचे ध्येय मात्र एकच होते – स्वातंत्र्य! स्वातंत्र्य मिळाल्यानंतर लोकांच्या अपेक्षा वाढल्या. त्यामुळे आंदोलनाचे स्वरूपदेखील बदलले. सगळेच प्रश्न एकसुत्री नव्हते. त्यात विविधता होती. मंडल आयोग, अयोध्या, नर्मदा, हिजाब, वेगवेगळ्या जातीसाठी आरक्षण, साबरमला, शनी शिंगणापूर मंदिर प्रवेश, किसान समस्या, नागरिकत्वाचे नवे कायदे, माहितीचा अधिकार, भोंग्याचे आवाज.. अशी अनेक उदाहरण देता येतील. त्यातील काही यशस्वी झाली. काही फसली. आंदोलन हे नेहमी नेत्याभोवती फिरते. त्याला जाती, धर्म, पक्ष याचे आवरण असले तरी नेतृत्व कुणाचे हे जास्त महत्वाचे. या लेखात अशा नेतृत्वाच्या तीन महत्व पूर्ण गुणाचा उल्लेख करायचा आहे. अभ्यास, संशोधनाद्वारे या तीन प्रमुख गुणाचे महत्व अधोरेखित झाले आहे.

Agitator, Innovator, Orchestrator म्हणजे चळवळ्या, नाविन्याचा ध्यास घेतलेला अन् संयोजनाची चांगली जाण असणारा नेता, हीरो असला तर बहुधा आंदोलन यशस्वी होते. आंदोलनाचा उद्देशच जुने त्यागून काळाला सुसंगत नव्याचा स्वीकार असे असते. कोणताही समाज, कोणतेही सरकार, कोणतेही व्यवस्थापन अशा क्रांतिकारी बदलाला सहसा तयार नसते. त्यामुळे समाजात जो असंतोष आहे, असमाधान आहे त्यामागची कारण परंपरा शोधून, नेमके काय बदल हवे आहेत, ते कसे करायचे, कुणी करायचे याचा स्पष्ट आराखडा नेत्याकडे असणे गरजेचे. म्हणजे त्या सर्व अंगाचा, परिणामाचा अभ्यास हवा. ने आहे ते नको, ते बदलायचे, तर त्याजागी काय हवे, हे अपेक्षित बदल कसे घडवून आणायचे हे समाधान, सोलुषन नेत्याकडे हवे. बदल एकांगी करता येत नाही. सर्व सहमतीनेच बदल घडविता येतात. म्हणजे तुमचे मुद्दे सर्व संबंधितांना पटवून देता आले पाहिजेत. जे जसे चालले आहे ते तसे यापुढे चालणार नाही असे समजावून, ठणकावून सांगता आले पाहिजे. जी समस्या आहे ती कुणा एकट्याची नाही, ती अनेकाशी किंवा बहुसंख्यांक लोकाशी निगडित आहे हे पटवून देता आले पाहिजे.

नाविन्याचा ध्यास घेणारा नेता संभावित अडी अडचणीचा अभ्यास करतो. त्याला मार्गावरील खाच खळगे ज्ञात असतात. तो वेगवेगळे पर्याय शोधतो. ते पर्याय कसे योग्य आहेत, सर्वांच्या फायद्याचे आहेत हे समजावून सांगतो.. त्यासाठी सर्वांची मदत घेतो. कारण चळवळी संबंधीचा



हा प्रवास समूहाचा असतो. त्यासाठी विषयाची सखोल समज हवी. अभ्यास हवा. पाठीशी दांडगा अनुभव हवा. वाकचातूर्य हवे. या कुशल नेत्याला नवे भविष्य, नवा समाज घडवायचा असतो. परंपरेने चालत आलेले नीती नियम बदलणे, त्यासाठी मन वळविणे हे एक व्रत असते. त्यासाठी साधनेचीच गरज असते. एरवी चळवळ फसते.

चळवळीचे संयोजन, नियोजन देखील तितकेच महत्वाचे. आपण सुचविलेले उपाय, मार्ग हाच कसा उत्तम पर्याय आहे, सर्वांच्या भल्याचा आहे हे दोन्ही पक्षी गळी उतरविता आले पाहिजे. संगीत संयोजक जसे सर्व वादकांना एका ताला सूरात बांधून ठेवतो तेच काम या नेत्याला करायचे असते. चळवळ जशी फोफावते, पसरते तशी त्यात गुंतागुंत निर्माण होत जाते. काही अनपेक्षित गोष्टी घडतात. आंदोलनाला वेगळे, विपरीत वळण लागू शकते. या सर्व शक्यतांचा विचार नेत्याला करावा लागतो. भविष्याचा अंदाज घ्यावा लागतो.आंदोलनात सहभागी सर्वांना बरोबर घेऊन वाटचाल करणे, घुसखोर मंडळींपासून सावध राहणे, आंदोलन बहकणार नाही हे डोळ्यात तेल घालून बघत राहणे, ही तारेवरची कसरत असते नेत्यांसाठी.

इनोवेशन शिवाय आंदोलन म्हणजे पर्याय न देता समस्येचे निरर्थक उत्तर शोधीत बसणे. नावीन्यपूर्ण कल्पना पण नियोजन, संयोजन शून्य म्हणजे परिणाम न साधणारी फोल कल्पना! एकूण काय आंदोलनकर्ते नेते समाजाला बदल घडवून आणण्याची गरज समजावून सांगतात. त्यानंतर ती समस्या सोडविण्याचे विविध पर्याय, शक्यता पडताळून बघतात. संयोजकांचे काम आपल्या जवळील उपलब्ध माहिती मुद्देसूद स्वरूपात सर्व पक्षापुढे ठेवणे. हे समस्येचे समाधान पाल्हाळ स्वरूपात नसावे. ते प्रॅक्टिकल असावे. अंमलबजावणीसाठी सोयीचे असावे. कायद्याला, नियमांना धरून असावे. सरकार किंवा व्यवस्थापनाला अडचणीत आणणारे नसावे. प्रस्थापित व्यवस्था भविष्यातील चांगल्यासाठी बदलणे, त्या बदलासाठी नावीन्यपूर्ण पण प्रॅक्टिकल, पर्याय सुचविणे अन् या पर्यायाच्या अंमलबजावणीसाठी संयोजन, नियोजन करणे, मुख्य म्हणजे सर्वांच्या सोयीचे समाधान होईपर्यंत पाठपुरावा करणे, या सर्व कार्यात सर्व समावेशक धोरण बाळगून सर्वांना बरोबर घेऊन वाटचाल करणे हे यशस्वी आंदोलनाचे आधारस्तंभ म्हणता येतील.

यात चुका होणारच. सारे काही मनासारखं घडणार नाही. आपण दिलेल्या पर्यायाचा विपरित परिणाम, निगेटिव्ह इम्पॅक्ट होऊ शकतो. कागदावर सारे छान असेल, पण अंमलात आणायचे तर अनेक अडचणी येऊ शकतील. प्रवासात मूळ उद्दिष्ट भरकटू शकते. भविष्याविषयीचे अंदाज चूकू शकतात. वातावरण स्वच्छ न राहता गढूळ होऊ शकते. गुणवत्तेशी तडजोड करावी लागते. दुधात पाणी मिसळल्यासारखे सारे गढुळते. अशावेळी नेतृत्व सावध असावे लागते. या नेतृत्वाला तीन ठिकाणाहून बळ मिळत असते. एक व्यक्तिगत स्वतःच्या करिष्म्याचे बळ. दुसरे सत्तेचे किंवा अधिकाराचे बळ. अन् तिसरे त्याच्या मित्रांचे, नात्याचे, ओळखी-पाळखीच्या बड्या व्यक्तीचे बळ. कुशल नेता ह्या सर्वांचा यथायोग्य उपयोग करून घेतो आंदोलनाच्या वाटचालीत. अनेकाचे तर सारे आयुष्य खर्ची जाते चळवळीत. नेते होणे सोपे असते. पण समाजाचे असली हिरो होणे तेव्हढेच कठीण! सगळ्याच लोखंडाचा परीस होत नाही! सध्या भारत जोडो आंदोलन सुरू आहे. हे आंदोलन वरील निकषात कुठे बसते हे तपासून पहायला हवे!

# जीवघेण्या सेल्फीचा मोह



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**सर्व जनजागृती मोहिमा आणि अनेक अपघातांची उदाहरणे समोर असतानाही तरुणांमध्ये जीवावर उदार होऊन सेल्फी काढण्याची किंवा धोकादायक ठिकाणी किंवा तशा परिस्थितीत फोटो काढण्याची हौस काही कमी होताना दिसत नाही. हे खरे तर चिंताजनक आहे. तरुण पिढी रेल्वे रुळांवरून येणा-या गाड्यांसमोर, उंच डोंगर, पूल इत्यादींच्या धोकादायक उंचीवर जाऊन सेल्फी काढताना, किती किशोरवयीन आणि तरुण-तरुणींचा मृत्यू झाला, याची नेमकी माहीत उपलब्ध नाही. मात्र अशा घटनांच्या बातम्या सर्रास सर्वच वृत्तपत्रे आणि टीव्ही चॅनेल्सवरून येत असतात. याबाबत बरीच चर्चा झाली आहे, होते आहे.**

शाळां-कॉलेजांमध्ये जनजागृती मोहिमा राबवण्यात आल्या आहेत, पण आश्चर्याची बाब म्हणजे अशा घटना कमी होताना दिसत नाहीत. परवा वाशीम शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या एकबुर्जी प्रकल्पात सेल्फीच्या नादात दोन युवकांचा बुडून मृत्यू झाला. पाच तरुण रविवारची सुटी असल्याने शहराजवळून पाच कि.मी. अंतरावर असलेल्या एकबुर्जी प्रकल्पावर फेरफटका मारण्यासाठी गेले होते. दरम्यान, सेल्फी काढण्याच्या नादात त्यांचा मोबाईल डोहात पडला. तो काढण्यासाठी दोघांनी पाण्यात उडी मारली. मात्र, पाण्याचा अंदाज न आल्याने त्या दोघांच्या डोक्याला खडकाचा मार लागल्याने त्यांचा मृत्यू झाला. काही महिन्यांपूर्वी किल्ल्यासोबत सेल्फी काढताना पाय घसरल्याने दरीत कोसळून एका तरुणाला जीव गमवावा लागल्याची घटना मुरुड जंजिरा येथे घडली होती. त्याच दरम्यान, गुरुग्राममध्ये रेल्वे रुळांवर व्हिडिओ बनवणाऱ्या चार तरुणांना अशाच प्रकारे गाडीखाली येऊन आपला जीव गमवावा लागला होता. त्या तरुणांना या धोक्याची कल्पना नव्हती यावर विश्वास ठेवता येत नाही, पण धोक्यांशी खेळण्याचे आणि सोशल मीडियावर फोटो टाकण्याचे त्यांना इतके वेड लागले होते की, ड्रायव्हरने वारंवार सायरन वाजवूनही ते रुळावरून बाजूला झाले नाहीत.त्यामुळे भरधाव वेगाने येणाऱ्या गाडीखाली आले आणि आपला जीव गमावून बसले.

जेव्हापासून प्रत्येकाच्या हातात मोबाईल आणि इंटरनेट आले आहे, तेव्हापासून सोशल मीडियावर तरुणांची सक्रियता वाढली आहे. अनेक तरुण-तरुणी खूप सर्जनशील काम करत असले, सिनेमे वगैरे बनवून पैसे कमावत असले, तरी कित्येकांना तिथे नुसते फोटो टाकून लाईक्स मिळवण्याचे फॅड मोठ्या संख्याने वाढल्याचे दिसत आहे. युट्युबवर त्यांचे चॅनल चालवणे, व्हिडीओ टाकणे आदी मोफत व्यवस्था असल्याने अनेक तरुण स्ट्रीट फूड, डोंगर-नद्यांचा सैरासपाटा, प्रसिद्ध ठिकाणांची माहिती देणारे व्हिडिओ टाकताना दिसतात.

काहीजण स्वयंपाकाच्या पाककृती टाकत आहेत, तर काहीजण आरोग्य, योगासने, आयुर्वेद इत्यादींचे अर्धवट ज्ञानाचा रतीब घालत आहेत. 'हंसी-मजाक'वाले फोटोही स्वस्तात सहज आणि भरपूर प्रमाणात उपलब्ध होत आहेत. साहजिकच राजकीय पक्ष आणि त्यांच्या नेत्यांबद्दल आक्षेपार्ह व्हिडिओ, विनोद आणि व्यंगचित्रांचे अक्षरशः पेव



फुटले आहे. सोशल मीडियावर अनेक प्रकारच्या कंटेंटचा बाजार भरला आहे. आजकालचे तरुण त्यातले कंटेंट स्वतःसाठी निवडतात आणि मग त्यांच्या प्रभावाखाली ते स्वतःही तेच कंटेंट देण्याचा प्रयत्न करताना दिसतात. गुरुग्रामच्या ताज्या दुर्घटनेत रेल्वेखाली ठार झालेल्या चार तरुणांचाही असाच जोश असावा. वेगवान ट्रेनसह काही तरी रोमांचक फोटो -व्हिडीओ मिळविण्याचा प्रयत्न होता.

वास्तविक, आजच्या तरुण पिढीचे साहसही सोशल मीडियामुळे दर्जाहीन होऊ लागले आहे. केवळ फोटो काढणेच नाही, तर गाण्याचा आणि संगीताचा छंदही इतका बेसुमार वाढला आहे की ते सतत मोठ्या आवाजात संगीत ऐकताना आणि म्हणताना दिसतात. ते घरी असोत, रस्त्याने चालत असोत किंवा गर्दीच्या ठिकाणी असोत, रस्ता ओलांडताना कानाला इयर प्लग लावून गाणी ऐकताना आणि जोरजोरात नाचताना दिसतात. सगळं विचित्रच चाललं आहे.

गाडी चालवतानाही मोठ्या आवाजात संगीत वाजवले जाते. गाडी सेल्फीस्टंट करताना किंवा फोटो काढताना अनेक तरुणांचा अपघातात बळी गेला आहे. अशा प्रकारे वाहन चालवल्यास भरमसाठ दंडाची तरतूद परिवहन विभागाने केली असली, तरी नियम व अटींचे पालन करतील ते तरुण कसले! नियम मोडण्यातही त्यांना आनंद वाटतो. तरुणांमध्ये वाढणाऱ्या या प्रवृत्तीला आळा घालण्यासाठी कुटुंब आणि सामाजिक पातळीवर प्रयत्न झाले, तरच काही तरी फलदायी ठरू शकेल.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# 2024 मध्ये महाभारत घडणार ?



प्रकाश महागावकर
संपर्क क्र. 9422007361

आधुनिक केसरी

**भारतीय जनता, मतदार आता या दहा वर्षात खूपच प्रगत विचारांचा झाला आहे. राज्यात नाचा पण केंद्रात मोदीच हवेत यावर जनता ठाम आहे. दिल्लीत बघा अरविंद केजरीवाल यांना दोन वेळा निवडून दिले परंतू लोकसभेच्या जागा भाजपच्या पारड्यात टाकल्या. बरे हे जे मोदीला पर्याय ठरू पहात आहेत त्यांची त्यांच्या राज्यात काय परिस्थिती आहे. पवार साहेब स्वबळावर सत्तेत येणे सोडा पण 48 पैकी आठ जागाही जिंकू शकत नाहीत. महाराष्ट्राबाहेर एखादा कोठेतरी निवडून येतो, तो त्याचे व्यक्तिगत बळावर. तेलंगणात मागच्या निवडणूकी नंतर भाजपने खुपच प्रगती केली आहे. मतांची टक्केवारी लक्षणीय वाढली आहे.**


काल ममता दीदी गरजल्या  2024 मध्ये मोदींना बघून घेऊ. मी स्वतः, नितीशकुमार, शरदचंद्र पवार आणि तेलंगणाचे चंद्रशेखर राव तसेच हेमंत सोरेन, आम्ही एकत्र येण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. आम्ही 2024 मध्ये नरेंद्र मोदी आणि भाजपाला लढा देऊ. आमचे नेतृत्व कोण करणार ते नंतर ठरेल. पण एकत्र येणे आणि भाजपला हरवणे हे ठरले आहे. कालच्या बोलण्यातच दुजाभाव भरभरून होता. दर्पोक्तीचा गंध होता. अडेलतट्टुपणाचाही स्पर्श होता. कॉंग्रेस वगळून विरोधीपक्षांची एकी, अरविंद केजरीवाल यांना भाव देणार नाही. शरदचंद्र पवार यांचेवर विश्वास नाही. नितीशकुमार चालतील पण नेतृत्व त्यांनाच देऊ असे नाही. चंद्रशेखर राव सीमित मान्य होऊ शकतील.

भाजप तीनशे + ची स्वप्ने पाहतोय. पण प. बंगालमध्ये मात्र त्यांचा पराभव निश्चित आहे. असले बरेच विविध प्रकारची विधाने करून जणू त्यांनी रणशिंग फुंकले.

भारतीय जनता, मतदार आता या दहा वर्षात खूपच प्रगत विचारांचा झाला आहे. राज्यात नाचा पण केंद्रात मोदीच हवेत यावर जनता ठाम आहे. दिल्लीत बघा अरविंद केजरीवाल यांना दोन वेळा निवडून दिले परंतू लोकसभेच्या जागा भाजपच्या पारड्यात टाकल्या. बरे हे जे मोदीला पर्याय ठरू पहात आहेत त्यांची त्यांच्या राज्यात काय परिस्थिती आहे. पवार साहेब स्वबळावर सत्तेत येणे सोडा पण 48 पैकी आठ जागाही जिंकू शकत नाहीत. महाराष्ट्राबाहेर एखादा कोठेतरी निवडून येतो, तो त्याचे व्यक्तिगत बळावर. तेलंगणात मागच्या निवडणूकी नंतर भाजपने खुपच प्रगती केली आहे. मतांची टक्केवारी लक्षणीय वाढली आहे.

बिहार मध्ये जेमतेम चाळीस बेचाळीस आमदार हाताशी असणारे नितीशकुमार कोणत्यातरी पक्षाशी म्हणजे भाजप किंवा राजद सोबत युती आघाडी केल्याशिवाय आपले उमेदवार निवडून नाही आणू शकत. मागच्या तीन निवडणूका त्यांची आमदार खासदार संख्या घटतीच आहे. अरविंद केजरीवाल यांनी दिल्ली व्यतिरिक्त









पंजाब जिंकून थोडी प्रगती नक्कीच केलेली आहे. परंतू  मोफतची आश्वासने, त्यातील फोलपणा, तसेच आता भ्रष्टाचाराचे होत असलेले वाढते आरोप, सहकाऱ्यांच्या अडकण्याच्या संख्येत होत असलेली वाढ. मदरसे, मशिदी आणि वक्फ बोर्ड यांच्या वर असलेली मेहरनजर आता बटबटीत दिसत आहे. प्रामाणिक करदात्यांच्या  पैशांची अशी वाताहत होत असलेली पाहून जनता जागृत होत आहे. शिवाय सरकार म्हणून कारभार करण्यात रमण्यापेक्षा ईथंतिथं तोंड खुपसत बसण्याची आवड जास्त आहे. दिल्लीचे मुख्यमंत्री म्हणून ते किती वेळ काम करतात आणि गोवा, गुजराथ, पंजाब, हरियाणा येथे किती लक्ष घालतात हा संशोधनाचा विषय आहे.

उच्चशिक्षित आणि प्रशासकीय नोकरीचा अनुभव असल्याने नवनवीन  प्रकल्पांची, योजनांची फक्त जाहीर वाच्यता करीत प्रकाशझोतात राहतात. आणि ममता बॅनर्जी मात्र मागच्या निवडणूकीत घवघवीत यश मिळवल्यामुळे हवेत आहेत.

अविचाराने आणि आक्रस्ताळेपणाने बाजू मांडताना विरोधकांबद्दल तुच्छता जाणवते. खरेतर आत्ता आत्ता झालेल्या निवडणुकीत भाजपने नैतिक विजय मिळवलेला आहे. जिथे शुन्य काम होते तेथे भाजपने मारलेली मुसंडी आणि पार केलेली पंच्चाहत्तरी लक्षणीय होती. तिथे ममतांना  टक्कर द्यायला कॉंग्रेस आणि किंवा मार्क्सवादी असायला हवे होते. परंतू ते दोघेही तर मरणासन्न आहेत. मग भाजपाने जोर लावला, ममता दीदींना टक्कर दिली. रोहिंग्या मुस्लिम आणि बांगलादेशी घुसखोर यांची नावे मतदार याद्यांमध्ये मोठ्या प्रमाणात घुसडून यश मिळवले आहे ममतांनी. तिथे भाजप जवळ संघटना नव्हती, नेते नव्हते तरी दोनतीन वर्षांचे अविरत मेहनतीने भाजपने जे कमावले ते खुप स्पृहणीय निश्चित होते.

पूर्वेकडील प्रदेशांमध्ये भाजपाने जे लक्ष दिले आहे. जो विकास घडवला आहे तो पाहता त्या राज्यांमध्ये नागरीकता  कायदा आणि घुसखोरांची  हकालपट्टी  यांची अंमलबजावणी झाली की मग त्या टापूत ममताच काय कोणताही देशविरोधी पक्ष टिकू शकणार नाही.

आजच्या भारतीय राजकारणातले भाजपा सोडून इतर अस्तित्वात असलेले राजकीय पक्ष हे कोण्यातरी नेत्याचे अहंकारातुन  कॉंग्रेस मधून फुटूनच स्थापित झालेले पक्ष आहेत. कॉंग्रेसने खाण्याचे विविध मार्ग शिकवले, मोकळीक दिली, अपेक्षांना उभारी दिली, मग वाढत्या अपेक्षा, हाव, लोभ त्या नेत्यांना कॉंग्रेस पासून दूर घेऊन गेला. आणि मग नेहरू गांधी घराण्याकडे पाहून सर्व भरकटलेले नेते स्वतः चे पक्ष काढत गेले. आणि आपापल्या घराण्यांचा उध्दार करत गेले. हे सर्व विरोधीपक्ष भाजपला हरवण्याचे  स्वप्न दिवसापण पहात आहेत.

2024 मध्ये भाजपा हा 2019 पेक्षाही किमान तीस ते चाळीस जागा जास्त जिंकणार आहे. कारण 2024 पूर्वी दोनतीन निर्णय असे काही मोठे आणि कठोर घेतले जाणार आहेत की विरोधक बघतच राहतील. पीओकेचा ताबा मिळवणे, समान नागरी कायदा लागू करणे, सर्जिकल स्ट्राईक करून एकाच वेळी चीन आणि पाकिस्तान यांना जरब बसवणे, नागरीकता याद्या अद्ययावत करणे, सर्व सिमाराज्यांमधिल घुसखोरांना देशाबाहेर  हाकालणे, आणि प्रमुख विरोधी नेत्यांची भ्रष्टाचाराची आणि देशद्रोहाची प्रकरणे उजागर करून दोनतीन मोठ्या नेत्यांना अटक होईल. सर्व पुराव्यांसह त्यांचेवर खटले दाखल होतील. आणि विरोधक खचून जातील. कारण एकही विरोधीपक्ष नेता भ्रष्टाचाराविरुद्ध बोलत नाही. जी प्रकरणे निघत आहेत ती केंद्र सरकार सूडबुद्धीने काढत आहे असे ओरडत आहेत पण ती प्रकरणे खोटी आहेत, आम्ही मिळवलेली संपत्ती, मालमत्ता आमच्या मेहनतीच्या कमाई तून केलेली आहे असे छातीठोकपणे कोणीच म्हणत नाही. फक्त ईडी किंवा सीबीआय किंवा आयकर खात्याने कारवाई केली की ही सूडबुद्धीने केलेली कारवाई असून विरोधी पक्षांना फोडण्यासाठी किंवा गप्प बसवण्यासाठी केलेली आहे असे म्हणत आपल्या कार्यकर्त्यांना भडकवणे  एवढेच काम  विरोधक करत असतात. वाट्टेल त्या मार्गाने वारेमाप कमाई केली आणि आपली सत्ता कधीच जाणार नाही, जातीपातीत विभागलेली जनता, अंधनुयायी, आणि भाडोत्री समर्थक यांना उचकावून फक्त सूड सूड ओरडायचे एवढेच विरोधी पक्षांना जमत आहे.

गेल्या आठ वर्षात बचावात्मक पावित्र्यात  वावरणाऱ्या एकाही विरोधी पक्षाने मेहनत घेऊन, शोध घेऊन भाजप सरकार वर एकही ठोस आरोप केलेला नाही. फक्त स्वतः चा बचाव करणे आणि त्यासाठी वाटेल तश्या कोलांट्याउड्या मारणे एवढेच करत आहेत विरोधीपक्ष नेते. त्यामुळे जसे  ममता दीदीं विरोधात भाजप शिवाय कोणी नव्हते म्हणून घवघवीत यश मिळवले अगदी तसेच विरोधकांची एकजूट नाही किंवा खमक्या  पर्यायच नाही म्हणून भाजप जिंकणार आहे.

# नात्यांची गुंतागुंत विशद करणारी 'मेरी'



अस्मिता प्रदीप येंडे
संपर्क क्र. 9619035195

आधुनिक केसरी

**'हिरवे वाळवंट' आणि 'नानाचा युरोप दौरा' या कथासंग्रहाला मिळालेल्या लोकप्रियतेनंतर लेखक जगन्नाथ वर्तक यांनी कादंबरीकार म्हणून पदार्पण केले आहे. नुकतीच त्यांची 'मेरी' ही कादंबरी प्रकाशित झाली. शारदा प्रकाशनाने प्रकाशित केलेली 'मेरी' ही कादंबरी मानवी मनाचा संघर्ष, नात्यातील गुंतागुंत आणि जगण्यासाठी सुरु असलेली धडपड  दर्शवणारी, संवेदनशीलतेची आणि दुःखाची किनार प्राप्त झालेली ही कादंबरी मनाचा ठाव घेते. लेखक वर्तक काही कामानिमित्त जेव्हा गोव्याला वास्तव्यास होते, तेव्हा त्यांनी तेथे जे दृश्य पाहिलं, आगीत जळून खाक झालेला कारखाना, तेथील निस्तेज वातावरण. या घटनेने लेखकाच्या मनात अस्वस्थता निर्माण केली आणि  या सत्य घटनेला आपल्या कल्पकतेने अनेक घटना जोडून आजच्या काळाशी सुसंगत वाटेल अशा पध्दतीने या कादंबरीचा विस्तार केला आणि 'मेरी' वाचकांच्या भेटीस आली.**

मराठी साहित्य विश्वातील ' कादंबरी' हा कथनात्मक साहित्यप्रकार वाचकांना भुरळ पाडणारा असा आहे.कथानक, घटना - प्रसंग , पात्रचित्रण, वातावरणनिर्मिती, निवेदनशैली, संवादशैली इत्यादी घटकांनी कादंबरी गुंफली जाते. मराठी साहित्यात बाबा पदनमजी यांच्या 'यमुनापर्यटन' या कादंबरीला पहिल्या कादंबरी म्हणून महत्व आहे.

कादंबरीतील कृतिप्रसंग आणि व्यक्तिचित्रण व त्यांच्या अनुषंगाने येणारी वर्णने, वातावरणनिर्मिती, प्रतीके आणि प्रतिमा या सर्वांच्या संश्लेषणातून कादंबरीचा घाट तयार होतो. हा घाट लेखकाच्या दृष्टिकोनानुसार घडत असतो. या घाटाचे कृतिप्रसंगादी घटक किंवा त्यांची बेरीज म्हणजे हा घाट नव्हे. स्त्रीच्या लावण्याप्रमाणेच तो एक अमूर्त परंतु प्रयत्नपूर्वक गोचर होणारा किंवा समजू शकणारा कादंबरीचा एक विशेष होय.

आधुनिक मराठी कादंबरीचा उदय, विस्तार व विकास लक्षात घेताना हरिभाऊपूर्व अद्‌भुतरम्य कादंबरी, हरिभाऊंची सामाजिक कादंबरी, वा. म. जोशी यांची तात्त्विक व चर्चाप्रधान कादंबरी, श्री. व्यं. केतकर यांची समाजशास्त्रीय कादंबरी, ना. सी. फडके, वि. स. खांडेकर, ग. ष्यं. माडखोलकर यांच्या कलात्मक कादंबऱ्या, विश्राम बेडेकर, मर्ढेकर, इत्यादींच्या मनोविश्लेषणात्मक व संज्ञाप्रवाहात्मक कादंबऱ्या, श्री. ना .पेंडसे, गो. नी. दांडेकर इत्यादींच्या प्रादेशिक कादंबऱ्या इत्यादींनी या साहित्यप्रकाराचे विकसनशील स्वरूप आधि सामर्थ्य स्पष्ट केले आहे.

साठीच्या दशकात ऐतिहासिक व पौराणिक कादंबरीलेखनात रणजित देसाई, ना. सं. इनामदार, शिवाजी सावंत वगैरेंनी एक नवे चैतन्य निर्माण केले आहे.

'हिरवे वाळवंट' आणि 'नानाचा युरोप दौरा' या कथासंग्रहाला मिळालेल्या लोकप्रियतेनंतर लेखक जगन्नाथ वर्तक यांनी कादंबरीकार म्हणून पदार्पण केले आहे. नुकतीच त्यांची 'मेरी' ही कादंबरी प्रकाशित झाली. शारदा प्रकाशनाने प्रकाशित केलेली 'मेरी' ही कादंबरी मानवी मनाचा संघर्ष, नात्यातील गुंतागुंत आणि जगण्यासाठी सुरु असलेली धडपड  दर्शवणारी, संवेदनशीलतेची आणि दुःखाची किनार प्राप्त झालेली ही कादंबरी मनाचा ठाव घेते. लेखक वर्तक काही कामानिमित्त जेव्हा गोव्याला वास्तव्यास होते, तेव्हा त्यांनी तेथे जे दृश्य पाहिलं, आगीत जळून खाक झालेला कारखाना, तेथील निस्तेज वातावरण. या घटनेने लेखकाच्या मनात अस्वस्थता निर्माण केली आणि  या सत्य घटनेला आपल्या कल्पकतेने अनेक घटना जोडून आजच्या काळाशी सुसंगत वाटेल अशा पध्दतीने या कादंबरीचा विस्तार केला आणि 'मेरी' वाचकांच्या भेटीस आली.

'विश्वास' हा कादंबरीचा नायक. वडिलांनंतर विश्वासने गावाच्या सरपंचपदाचा भार सांभाळावा, अशी वडील आणि गावकरींची इच्छा असते.पण विश्वासचे ध्येय वेगळेच असते. आपलं शिक्षण पूर्ण झाल्यानंतर तो नोकरी न करता वीजयंत्रे निर्मितीचा कारखाना काढतो. कादंबरीत जो काळ चित्रित झाला आहे, त्या काळी खेड़ेगावात वीज पोहचलेली नव्हती. गावागावात उजेड पसरला पाहिजे, अंधार दूर झाला पाहिजे, हे ध्येय उराशी बाळगून तो कारखाना उभारतो. 'विश्वा जनरेटर्स' या नावाने  हा कारखाना सुरु होतो. साडेसातशे कामगारांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न मार्गी लागतो. तसेच विश्वास या कामगारांच्या राहण्याची तसेच इतर सोयी - सुविधा यांचीही उत्तम सोय करतो तसेच कामगारांच्या उज्ज्वल भविष्यासाठी विविध योजना ही अंमलात आणतो. एक उत्तम कारखानदार म्हणून विश्वास हे पात्र आदर्श निर्माण करतं तसेच आपल्या कामगारांविषयी असलेली काळजी, तळमळ तसेच कारखान्यातील अन्य अधिकारी यांच्याबद्दल असलेला आदर, कामाप्रति निष्ठा असणारा विश्वास हे पात्र तितकेच संवेदनशील सुद्धा आहे.

कादंबरीचं कथानक एका विशिष्ट काळात घड़त असल्याने काही तेव्हाचे संदर्भही यात वाचावयास मिळतात.तृतीय पुरुषी निवेदन आणि पात्रांच्या संवादातून कादंबरी उलगड़त जाते. सहज- सोपी भाषाशैली आणि प्रवाहीपणा ही या कादंबरीची वैशिष्टये आहेत. कादंबरी वाचताना कुठेही कंटाळवाणे वाटत नाही. उलट पुढे काय घडणार ही उत्सुकता पावलोपावली मनात जीवंत राहते. ही जादू लेखकाच्या लेखणीची आहे.

कादंबरीचं शीर्षक आहे 'मेरी' .. आता मेरी या पात्राचा प्रवेश होतो. मेरी, अनाथ म्हणून वाढलेली, एका चर्चच्या पायऱ्यांवर फादर यांना सापडते, आणि ती या संस्कारात लहानाची मोठी होते. चर्चच्या पायऱ्यांवर मिळाली म्हणून तिचं नाव मेरी ठेवलं जातं पण तिला तिचे आई- वडील, तिचा धर्म माहीत नसल्याने तिची होणारी घुसमट, दुःख तिच्या संवादातून समजतं. मेरी ही कारखान्यात विश्वासची स्वीय सहायक म्हणून कामास




सुरुवात करते. मेरी हे पात्र जितके संयमी तितकेच हुशार, चाणाक्ष आणि कोणतेही निर्णय घेताना विचारपूर्वक घेणारी , तितकीच हळवी, कौशल्याने काम करणारी आणि कोणताही तिढा बुद्धिचातुर्याने सोडवणारी मेरी हे पात्र केन्द्रस्थानी आहे. मेरी आपल्या वैचारिक, बौद्धिक आणि संवेदनशील वृत्तिने कारखान्याला आणि विश्वासला कसा आधार देते, आपलं कर्तव्य ती कशी पार पाडते, याची विलक्षण कहाणी म्हणजे ही कादंबरी!

कारखाना, कामगार, त्यांच्या समस्या, संप हे सर्व सांभाळताना विश्वासचं रेवतीशी विवाह होतो.रेवती ही विश्वासच्या वडिलांच्या मित्राची मुलगी.रेवतीही स्वतःचा कारखाना सांभाळते. विश्वासचं रेवतीशी विवाह झाल्यानंतर कादंबरीला एक वेगळेच वळण प्राप्त होतं.स्वतःचं अस्तित्व शोधणारी मेरी, वैवाहिक जीवनाची विटंबना सहन करणारा विश्वास आणि आपलं प्रेम मिळवण्यासाठी धडपडणारी रेवती , या तिन्ही पात्रांचा सुरु असलेला आंतरिक संघर्ष , अस्वस्थता , या तिघांचं आयुष्य  एकमेकांत कसे गुंतून गेले आहे, याचे चित्रण वास्तवता दर्शवणारे आहे.यातील प्रत्येक पात्राचे व्यक्तिचित्रण अगदी सूक्ष्मपणे आणि ठळकपणे लेखकाने शब्दांकित केले आहे.

या मुख्य पात्रांखेरीज इतर पात्रे, कारखान्यातील अधिकारी, वकील, डॉक्टर, डॉमनिक ड्राइवर , मेरीचा अंगरक्षक पक्या दादा , जना, यमुना, भारतीय सैन्यदलात असलेला कैप्टन प्रशांत राणे या पात्रांनी आपल्या भूमिका उत्तम साकारल्या आहेत.

ध्येयवादी, निष्ठावान,संयमी, कर्तृत्ववान,  विश्वास तसेच हुशार, गुणी, प्रामाणिक, कर्तव्यपरायणता जपणारी, मारिया आईची भक्तिभावाने पूजा करणारी आणि प्रत्येक प्रसंगात विश्वासला साथ देणाऱ्या मेरीचं पुढे काय होते  ? विश्वासला त्याला हवा असलेला आनंद, सुख मिळतं का  ? रेवती अशी का वागते ? या प्रश्नांची उत्तरे  मिळवण्यासाठी कादंबरी वाचायला हवी ! जगण्यासाठी संघर्ष करावाच लागतो. येणारे प्रसंग, अडचणी आपल्याला जगण्याचं बळ देत असतात म्हणून येणाऱ्या प्रसंगांना धीराने सामोरे जाण्याची मनाची तयारी हवी, हा संदेश सुद्धा यातून मिळतो.

कादंबरी वाचल्यानंतर 'मेरी' ही मनात रुंजी घालत राहते, त्या पात्राशी आपण एकरूप होतो, त्यांच्या वेदनेशी आपण जोडले जातो, याचे कारण कथानकाची मांडणी, त्याचा विस्तार, संवाद, कादंबरीचा काळ उत्तमरित्या लेखकाने उभा केला आहे. कादंबरीचं मुखपृष्ठ किती आकर्षक आहे, मेरी या पात्रांचं चित्र आंतरराष्ट्रीय दर्जाचे छायाचित्रकार उमेश कवळे यांनी सुरेख रेखाटले आहे. साडी नेसलेली, मोकळे केस आणि कपाळावर टिकली आणि नाव 'मेरी' हे समीकरण चित्रात समर्पकपणे उतरले आहे. कादंबरीला लेखक ,कवी, गीतकार  कमलाकर राऊत यांनी प्रस्तावना लिहिली आहे. तसेच मलपृष्ठावर प्रा. संतोष राणे  यांनी कादंबरीची वैशिष्ट्ये थोडक्यात विशद केली आहेत. ही वाचनीय कादंबरी रसिक वाचकांच्या संग्रही जरूर असावी !

( मेरी - कादंबरी / लेखक जगन्नाथ वर्तक / प्रकाशक : शारदा प्रकाशन / पृष्ठे : ३९४ / मूल्य : ५०० रुपये)

# ११ सप्टेंबरची शिकवण !



रवींद्र मुळे
संपर्क क्र : ९४२२२२१५७०


आधुनिक केसरी

**भौ तिक साम्राज्यवादी विचार आणि धार्मिक उन्मादी आतंकी दृष्टिकोन यातून जगाला सावरण्यासाठी एकमेव उपाय भारतीय, हिंदू जीवनदर्शन हे आहे. हे स्वामीजींनी ११ सप्टेंबर १८९३ साली प्रतिपादित केले. जगाला हे समजावून सांगण्याचे त्यांनी प्रयत्न केले. पण या विचारामागे शक्ती उभी करण्यात आम्ही कमी पडलो. स्वामीजी केवळ शिकागो येथे प्रतिपादन करून थांबले नाहीत. तर त्यांची भविष्यवाणी ते जेथे जात होते, बोलत होते, मार्गदर्शन करत होते तेथील मंडळींना सावध करत होती. काही शतकांचा जागतिक विमर्ष बदलण्याचा तो श्री गणेशा होता.**

काही दिवस, काही तारखा या जगाच्या इतिहास, भूगोल या दृष्टीने फार महत्वाचा असतात. त्या तारखा काही इतिहास निर्माण करतात ! तो दिवस एक अभूतपूर्व बदलासाठी जन्म घेतो आणि मग आम्ही त्या दिवसाची आठवण काढत राहतो ! त्यातून जे काही शिकतात ते शिकतात जे दिंनदर्शिकेवरची तारीख म्हणून बघतात ते काहीही बोध घेत नाही. अशीच एक तारीख आहे ११ सप्टेंबर ! या तारखेचेच दोन दिवस हे ऐतिहासिक आहेत आणि विशेष म्हणजे या एकाच तारखेच्या दोन दिवसांचा अमेरिका या शतकातील वैभवसम्पन्न राष्ट्राशी समबंधित आहेत. एक आहे ११ सप्टेंबर १८९३ आणि दुसरी आहे ११ सप्टेंबर २००१ !

बरोबर १२९ वर्षापूर्वी शिकागो येथे जागतिक धर्मपरिषद भरली होती. तो काळ देशाच्या पारतंत्र्याचा होता. औद्योगिक क्रांतीनंतर माणसाचे भौतिक प्रगतीचे मॉडेल सुसाट वेगाने पळत होते. इंग्रजांनी अनेक देशांना आपल्या टाचेखाली ठेवत, गुलाम बनवत सत्ता स्थापन केली होती. भारतावर पण असा एकछत्री अंमल सुरू झाला होता. भारतीय संस्कृती, भारतीय लोक याबद्दल अत्यंत चुकीचा प्रचार सर्व पाश्चात्य देशात जाणीवपूर्वक पसरवला गेला होता. हिंदू समाज, हिंदू परंपरा आणि हिंदू जीवनदर्शन हे एकूणच अवैज्ञानिक आणि रानटी पणाचे ठरवले जात होते.

या पार्श्वभूमीवर स्वामीजी शिकागो येथे पोहचले होते. त्यांच्या वेशभूषेपासून सर्व गोष्टींची यथेच्छ टिंगल टवाळी केली जात होती. पण त्या सर्वांचा अहंकार आत्मविश्वासाने भरलेल्या आणि आपले गुरु रामकृष्ण परमहंस यांच्या मार्गदर्शनाने भारलेल्या स्वामीजींनी आपल्या केवळ दोन शब्दात उतरवला . ' बंधूंनो आणि भगिनींनो ' हे ते दोन शब्द ! सगळे जाणकार या शब्दांना ओळखतात ! पण या दोन शब्दांनी संपूर्ण जगाचा विमर्ष बदलण्यास सुरुवात झाली. मनुष्य एक प्राणी समजून त्याच्या भौतिक विकासाचा विचार विज्ञानाच्या मदतीने करणारा पाश्चात्य विचार! 'बळी तो कान पिळी 'या तत्वाने जगावर अधिराज्य गाजवणाऱ्या पाश्चात्य विचाराला भविष्यातील धोके सांगणारे स्वामीजी यांचे ते उद्‌बोधन होते. अर्थात पाश्चात्यांची विज्ञानातील प्रगती स्वीकारून त्याचवेळेस भारताच्या अध्यात्मिक जीवन दर्शनाला कमी लेखू नका कारण भारत या देशाचे एक कार्य नियतीने ठरवून दिले आहे. ते कार्य आज ना उद्या पूर्ण करण्यात यशस्वी होणारच आहे हे त्यांनी निक्षून सांगितले.



आज जेंव्हा १२९ वर्षाचा काळ मागे वळून आपण बघत आहोत तेंव्हा जागतिक पातळीवरील घटनाक्रमांचा धोंडळा घेतला तर स्वामीजी यांचे ते भाषण आणि त्यानंतरचे सर्व मार्गदर्शक भाषणे सत्यात उतरताना दिसत आहेत. विशेषतः कोरोनाच्या पार्श्वभूमीवर जगाला पुन्हा एकदा नवी समीकरणे मांडायची असतील तर निश्चितच स्वामीजींनी दाखवलेला मार्ग हाच एकमेव आशेचा किरण आहे.

धार्मिक उन्मादाचे पेव फुटलेले असताना त्या उन्मादाला हवा देणाऱ्यांना याचे भयंकर परिणाम याच तारखेला २१ वर्षांपूर्वी भोगावे लागले हा दैवदुर्विलास म्हणावा लागेल. २१ वर्षांपूर्वी याच दिवशी विमान न्यूयॉर्क शहरात आकाशाकडे झेपावले पण त्यांनी दिशा पकडली गगनचुंबी इमारतींची ! जगाचे पोलीस बनलेल्या आणि आपल्याच गुर्मीत असणाऱ्या अमेरिकेला भस्मासुर राक्षसाचा प्रत्यय आला. त्या भस्मासुराला मारून सुडाचा कंड जरी अमेरिकेने भागवला असला तरी मुळ प्रश्न काही सुटले नाही !

विज्ञानाच्या प्रगतीने स्वतःचा साम्यवादी विचार गुंडाळून ठेवत भांडवलवादी चीनने साम्राज्यवादी धोरण राबवण्यास सुरुवात केली आणि त्याचाच परिणाम म्हणून संपूर्ण जगाला वेठीस धरत जैविक युद्धासारखे संकट लोकांवर लादले. सारे जग यात होरपळून निघाले. आर्थिक प्रगतीचे ढोल वाजवणारे आणि परग्रहांवर लोकवस्ती थाटू पाहणाऱ्या मनुष्याला कोंडून स्थिर करणारे हे संकट माणसाला विवेकानंद यांच्या विचाराकडे घेऊन जाणार काय ? हा खरा प्रश्न आहे.

निसर्गाचे दोहन करण्याऐवजी निसर्गाचे शोषण करणारी तथाकथित वैज्ञानिक आणि औद्योगिक प्रगतीने कार्बन उत्सर्जनाचे, पर्यावरणाचे नवे प्रश्न निर्माण झाले. दूषित हवा, दूषित पाणी हे प्रश्न गंभीर होण्याचे कारण एकांगी भौतिक प्रगतीचा पाश्चात्य विचार ! पर्यावरणाच्या संतुलनाची शाश्वत सूत्रे भारतीय जीवन दर्शनात आहेत हे स्वामीजी निक्षून सांगत होते. आम्हाला ती समजणार का?

भौतिक साम्राज्यवादी विचार आणि धार्मिक उन्मादी आतंकी दृष्टिकोन यातून जगाला सावरण्यासाठी एकमेव उपाय भारतीय, हिंदू जीवनदर्शन हे आहे. हे स्वामीजींनी ११ सप्टेंबर १८९३ साली प्रतिपादित केले. जगाला हे समजावून सांगण्याचे त्यांनी प्रयत्न केले. पण या विचारामागे शक्ती उभी करण्यात आम्ही कमी पडलो. स्वामीजी केवळ शिकागो येथे प्रतिपादन करून थांबले नाहीत. तर त्यांची भविष्यवाणी ते जेथे जात होते, बोलत होते, मार्गदर्शन करत होते तेथील मंडळींना सावध करत होती. काही शतकांचा जागतिक विमर्ष बदलण्याचा तो श्री गणेशा होता.

आज जगभर योग या विषयाचे निर्माण झालेले आकर्षण , संस्कृत भाषेची सिद्ध झालेली वैज्ञानिकता , भगवद गीतेबद्दल वाढणारी श्रद्धा , भारतीय खाद्य पदार्थांच्या बद्दल वाढणारे कुतूहल आणि भारतीयांची आत्मनिर्भर भारताकडे चाललेली वाटचाल हे सगळे स्वामीजींनी केलेल्या ११ सप्टेंबर च्या उद्‌बोधनाची यथार्थतेचि जाणीव करून देतात !

दुर्दैवाने देशाच्या स्वातंत्र्यानंतर स्वामी विवेकानंद आणि छत्रपती शिवाजी महाराज या दोन व्यक्तित्वाच्या कडे केलेले अक्षम्य दुर्लक्ष देशालाच नव्हे तर जगाला महागात पडले आहे. स्वामीजी यांच्या विचारांचा प्रसार करण्यासाठी छत्रपतींच्या इतिहासातून शक्ती साधना करण्यात आम्ही कमी पडलो परिणामी या देशाच्या नियत कर्तव्यालाच मुकलो. अर्थात काळगती बदलण्यासाठी वेळ कधीच गेलेली नसते आणि म्हणूनच ११ सप्टेंबर हा दिवस विश्वबंधुत्व दिवस म्हणून जगाने कृतीत आणायचा असेल तर प्रथम भारतीय, हिंदू समाजाने आत्मसात करावा लागेल.

हिंदू विचार, संस्कृती, जीवन दर्शन याबद्दल कुठलेही न्यूनगंड न बाळगता आम्ही सर्व क्षेत्रात वाटचाल करु तेव्हाच जगाच्या कल्याणाचा मार्ग प्रशस्त होईल हे स्वामीजींचे विचार आज नाही स्वीकारले तर उद्या स्वीकारावेच लागतील हीच ११ सप्टेंबरची या दिवसाची आम्हाला शिकवण आहे. युगपुरुष कालगणना दिवस आणि वर्षात करत नसतात आणि त्यामुळे नव्या युगाचा नवा विमर्ष प्रस्थापित करणारे स्वामीजी होते. तो विमर्ष कृतीत आणण्यासाठी पुरुषार्थ जागवू या !

# संस्कारांची कमतरता

आधुनिक केसरी

**कोवळ्या मनावर स्वभवतालच्या वातावरणाचा केवढा परिणाम होतो आणि तो सहज वागणूक मध्ये येतो. या मुलांचे लहानपणचे हे खेळ असतील तर मोठेपणी कोणते खेळ खेळतील. कदाचित असे होणार नाही. माझ्या मनातील भाव व्यक्त करत आहो असे होऊ पण नये. या दृष्याने मन पिडीत झाले. सर्व पाल्यांनी आपला व्यवहार आपल्या मुलांन समोर कसा करावा. आपन आजपर्यंत जे केले ते विसरून आपल्या येणाऱ्या पिढी कडे लक्ष दिले पाहिजे. आपल्या वागण्यात त्यांचे वागणे असते आपले संस्कार त्यांचे संस्कार असतात. हे विसरता कामा नयेत.**

प्रत्येक व्यक्तिने आपले गांव व जे शहरात राहतात अशा सर्व जणांनी हा विचार केला पाहिजे की, फक्त माझा मुलगा चांगला झाला पाहिजे बाकीच्यांशी मला काय घेणं देनं परंतु असा विचार करून चालणार नाही. भविष्यात आपला मुलगा चांगला झाला आणि गल्ली गावातील मुलं चांगली नसतील तर आपला एकटा मुलगा काय करेल. त्याला त्याच्यासारखी मुलं कोठून मिळतील.तो शहरात किंवा विदेशात गेला तर त्याला मित्र तयार करायला, त्यांना समजायला बराच काळ लागतो व त्यांच्या जवळ सर्व असूनही तो एकटा पडतो आणि बालपणी च्या मित्रांची बरोबरी नतंरच्या मैत्रीत येत नाही. तो शिकून सवरून त्या गल्लीत किंवा त्याच गावात राहलातरी त्याला त्यांच्याशी जमाणार नाही. आपला एकटा मुलगा चांगला होऊनही फायदा नाही त्याच्या सोबत असणारे सर्व गल्लीतील व गावातील मुलं सूद्धा चांगली झाले पाहिजेत यातच सर्वांचे कल्याण आहे. हा भाव सर्व पाल्यांनी अंगीकारला पाहिजे त्याच बरोबर आपले जिवनाती व्यवहार चांगले असावेत. आपली मूले तेच शिकतात जसे वातावरण त्यांच्या आजूबाजूला असते व त्यांच्या खेळण्यात- वागण्यात आजूबाजूच्या शेजाऱ्या-पाजाऱ्यांचा प्रभाव असतोच.

हे मी जे काही लिहीत आहे हे तुम्हाला पण माहीत आहे. नवीन नवीन काही नाही. हा माझा सर्व प्रयास यासाठी करीत आहो. प्रवास करत असतांना एका खेडेगावात पोहचलो त्या गावातील काही मंडळी आम्हाला पाहून जवळ आली, चर्चा चालू झाल्या. आपलं ठरल्याप्रमाणे तूमच गाव फारच छान वाटतो, एक माणूस मध्येच माझे शब्द कापून बोलला. मग आमच्या गावाला आदर्श गाव पूरस्कार मिळाला आहे. तेथे बराच वेळ गप्पा करुन दूसरीकडे जायला निघालो. थोड्याच अंतरावर रस्त्याच्या कडेला मला दोन लहान मुलं काहीतर खेळबास (म्हणजे लहान मुल घर करतात त्यात भांडी, टाकावू सामानापासून केलेली, कोणी दुकान लावतो असे खेळ.) खेळत होते. सहज उत्सुकतेपोटी मी त्यांच्या जवळ गेलो. ते मुल खेळात तसे मग्न होते. ते दोघे होते. त्यांनी दोन दूकाने मांडली होती व आपसात बोलत होते. मी त्यांच्याजवळ जावून विचारलं कशाचे दुकान आहे. ते थोडे चपापले. पाहतो तर त्यांदोघांनी कुठून तरी छोट्या-छोट्या दारूच्या बाटल्या आणल्या होत्या, पाण्याची व्यवस्था केली होती. काही बाटल्यांचे झाकण म्हणजे भांडे व त्यातील पदार्थ म्हणजे झाडाची पानं असा तो खेळ चालू होता. त्यांच्या एकंदरीत सर्व गोष्टीवरु समजल की, ते दारुचे दूकान आहे. मी त्यांचा फोटो सुद्धा घेतला. तेथून मी अगदी अस्वस्थ झालो गेली दोन दिवस झाले, परंतु ते दृष्य माझ्या मनातून जात नाही. म्हणून हा लिहण्याचा प्रयास केला. कोवळ्या

राजेश राठोड



मनावर स्वभवतालच्या वातावरणाचा केवढा परिणाम होतो आणि तो सहज वागणूक मध्ये येतो. या मुलांचे लहानपणचे हे खेळ असतील तर मोठेपणी कोणते खेळ खेळतील. कदाचित असे होणार नाही. माझ्या मनातील भाव व्यक्त करत आहो असे होऊ पण नये. या दृष्याने मन पिडीत झाले. सर्व पाल्यांनी आपला व्यवहार आपल्या मुलांन समोर कसा करावा. आपन आजपर्यंत जे केले ते विसरून आपल्या येणाऱ्या पिढी कडे लक्ष दिले पाहिजे. आपल्या वागण्यात त्यांचे वागणे असते आपले संस्कार त्यांचे संस्कार असतात. हे विसरता कामा नयेत. तसेच आपल्या मुला सोबत शेजारच्या मुलांचाही तसाच विकास व्हावा शेवटी तो आपल्या मुलाचा मित्र आहे. आपल्या मुलाचा मित्र आपल्या मुला सारखा समजावा. भविष्य बदलण्याची ताकद आपल्यात आहे. बलशाली, संस्कारी, समर्थ समाज बनवण्याचे कार्य हे आपले आहे. असे समजून मुलांना त्या दृष्टीने घडवा व आपल्या वाईट आचरणाचा परिणाम आपल्या मुलांनवर होणार नाही म्हणून स्वतःप्रती कठोर होउन आपल आचरण सुद्धा बदलण्याची पराकाष्ठा करावी लागेल.

# अन् मी पुन्हा शाळा बुडवली नाही

आधुनिक केसरी

गावात जिल्हा परिषदेच्या शाळेत शिकत असतांना आपले गाव,आपले गुरुजी व पोरं ही गावातले असल्यामुळे शाळेचा लळा लागला होता.पण आता आठवीला नव्या शाळेत प्रवेश घ्यायचा अन शाळा ही गावापासून पाच किलोमीटर दूर दुसऱ्या गावात असल्याने थोडं टेन्शन आलं होतं पण दुसरा पर्याय नव्हता म्हणून मी माझ्या गावातील वर्गमित्रासोबत आठवीच्या वर्गात प्रवेश घेतला. मी आठवीला गेलो तेव्हा मोठा भाऊ त्याच शाळेत दहावीच्या वर्गात होता.साधारण फेब्रुवारी महिन्यात दहावीच्या सराव परीक्षा होऊन त्या मुलांना बोर्डाच्या परीक्षेच्या अभ्यासासाठी सुट्ट्या दिल्या म्हणून भाऊ घरी राहून अभ्यास करू लागला मग मला ही शाळेत जाण्याचे जीवावर आले तसेच माझे गावातील दोन्ही वर्गमित्र त्यांची ही गत या पेक्षा वेगळी नव्हती.. म्हणून आम्ही तिघेही फेब्रुवारी पासून शाळेत जाणे बंद केले.



ज्ञानेश्वर गायके
मो.नं. 9403384889

शाळा परगावी असल्यामुळं गुरुजी माझ्या गावात येऊन मार देण्याची शक्यता नव्हती म्हणून आम्ही निर्धास्त होतो.मी शाळेत जात नाही हे लक्षात आल्यामुळे वडिलांनी विचारले की तू आता शाळेत का जात नाही तर मी खोटं बोललो की आता दहावीच्या पोरासोबत आमचं ही शिकवणं पूर्ण झाल्यामुळे शाळेत फक्त रिवीजन घेतात म्हणून सर म्हणाले की खेड्यावरील मुलं आता शाळेत आले नाही तरी चालेल.

पण एक दिवस गल्लीतील नववीत शिकणाऱ्या मुलाच्या हस्ते आम्हा तिघांच्या घरी मुख्याध्यापकांनी पालकांना आपले पाल्य गैरहजर असल्यामुळे त्यांना शाळेतून काढून टाकण्यात येत असल्याची नोटीस पाठवली अन वडिलांना समजले की मी खोटं बोलत होतो.वडील रागावले पण त्यांनी मारलं नाही याचा आनंद झाला व दुसऱ्या दिवशी वडिलांच्या सांगण्यावरून शाळेत गेलो.

शाळेत पहिल्या तासाला आलेल्या गुरुजीं की ते नेमके मागील दोन दिवस शाळेत नसल्याने त्यांनी फक्त त्यांचा विषय शिकवला व ते निघून गेले अन आम्हाला वाटले की सुटलो बुवा एकदाचं..पण कशाचं काय.. दुसऱ्या तासाला मराठीचे शिक्षक वर्ग आले व त्यांनी आम्हाला जवळजवळ महिनाभर शाळेला दांडी मारली म्हणून संपूर्ण तासभर घोडा करण्याची शिक्षा दिली की ती अशी की वाकून पायाचा अंगठा धरून ठेवणे व त्यानंतर पाठीवर दगड ठेवला जात असे. थोडी हालचाल केली की दगड पडत असे व दगड पडला की मग छड्याची शिक्षा ठरलेली असे.

आमच्या तिघांचा आता घोडा झाला होता व एका मुलाला सरांनी बाहेरून तीन दगडं आणायला सांगून आमच्या पाठीवर ठेवले.

सरांनी शिकवणे सुरू केले पण कोणाचेही लक्ष त्यांच्या शिकवण्याकडे नव्हते कारण त्यांच्या समोर तीन माकडं घोडा होऊन उभे होते.सर्व मुलं मनातल्या मनात हसत होते पण सरांच्या धाकाने सारे गप्प बसले होते. आता एक तास ही जीवघेणी शिक्षा भोगल्या शिवाय सुटका नाही हा मनाचा पक्का निर्धार झाला होता पण दहा मिनिटेच झाली अन सरांचे नातेवाईक आले म्हणून सर त्यांना चहा प्यायला घरी घेऊन गेले.जातांना इतर मुलांना बजावून गेले की यांच्या पाठीवरचा दगड पडता कामा नये.तसे झाले तर मला सांगा.. मग यांची हयगय नाही.

अन गुरुजी घरी गेल्यानंतर वर्गातील सर्व मुलांनी आम्हाला विश्वास दिला की तुम्ही आता निवांत बसा.. गुरुजी येतांना दिसले की पुन्हा घोडा करून तुमच्या पाठीवर दगड ठेवून देऊ..अन त्याप्रमाणे गुरुजी अर्ध्या पाऊण तासाने परत वर्गात येतांना दिसले व आम्ही पुन्हा ते वर्गात येण्याच्या आत घोडा झालो व एका वर्गमित्राने पाठीवर दगड ठेवला.

सर वर्गात आल्यानंतर आमचा आज्ञाधारकपणा पाहून खुश झाले व आम्हाला त्या शिक्षेतून मुक्त केले.आता फक्त शाळा सुटण्यास एक तास वेळ होता म्हणून हिंदीचे सर तासांवर आले अन त्यांनी आम्हा तिघांना पाहिले असता उभे केले व छडी हातात घेऊन माझ्या दोन्ही वर्गमित्रांना झोडपून काढले आता माझा नंबर होता फटके खाण्याचा..अन सर माझ्या जवळ आले. मी भीतीने थरथर कापत होतो. सर माझ्या जवळ येऊन म्हणाले की तुला सहामाहीच्या परीक्षेत सर्वात जास्त मार्क मिळाले आहे म्हणून तुझी ही चूक माफ करतो. अशी शाळा बुडवणे तुझ्या सारख्या होतकरू मुलाला शोभत नाही..अन शिक्षणाने खऱ्या अर्थाने तू तुझ्या घरची हलाखीची परिस्थिती बदलू शकतो अन आयुष्याचं मातेरं होण्यापासून वाचवू शकतो म्हणून चांगली शाळा शिक अन मी आशा करतो की तू इथून पुढे रोज शाळेत येशील. अन त्या नंतर मी आयुष्यात कधीही शाळा बुडवली नाही.

# शिवाजी विद्यापीठाच्या कुलसचिवांना अभाविपने घातला घेराव

## शेकडो विद्यार्थी आले विद्यापीठाच्या दारी पण कुलगुरूंची प्रभारीपदासाठी मुंबई वारी

आधुनिक केसरी न्यूज



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०२२ च्या उन्हाळी सत्र परीक्षा मागील दोन महिन्यामध्ये पूर्ण झाल्या आहेत. यामध्ये अनेकदा विविध विद्या शाखांचे पेपर फुटल्याचे निदर्शनास आले. या विषयाबाबत अभाविपणे मागील आठवड्यात आंदोलन केले होते व संबंधित महाविद्यालय, प्राध्यापक, इतर कर्मचारी तसेच विद्यापीठाचे परीक्षा नियंत्रक असणारे डॉ. अजितसिंह जाधव यांच्या वरती समिती बसून योग्य ती कारवाई करावी अशी मागणी केली होती, परंतु त्यावर मा. कुलगुरू महोदय डॉ. डी टी शिर्के यांनी कोणताही निर्णय घेतला नाही. यामुळे आज विद्यार्थी परिषदेला तीव्र स्वरूपाचे आंदोलन करावे लागले.

या सर्व प्रकरणात भर म्हणूनच की काय विविध विद्याशाखांचे निकाल लागत असताना यामध्ये मोठ्या प्रमाणात त्रुटी असल्याचे निदर्शनास आलेले आहे. अनेक विद्यार्थी हे पेपरला हजर असून देखील ऑनलाइन निकालामध्ये गैरहजर दाखवले गेले आहेत, अनेक विद्यार्थ्यांना पेपर बरोबर लिहूनसुद्धा शून्य गुण मिळाले आहेत, तर काही विद्यार्थ्यांना समान गुण मिळून त्यातील एक विद्यार्थी पास तर दुसरा नापास असे देखील प्रकार घडलेले अभाविपच्या निदर्शनास आलेले आहे. विद्यापीठाचे अनेक पेपर हे वेळेआधी फुटल्या मुळे फेर परीक्षा विद्यापीठ घेत आहे.

बहुतांश विद्यार्थी हे पदवी नंतर पुढे प्रवेश घेण्याच्या तयारीत असताना विद्यापीठ व परीक्षा विभागाच्या चुकीमुळे या विद्यार्थ्यांचे प्रवेश रखडले जाण्याची शक्यता निर्माण झालेली आहे. अनेक विद्यार्थ्यांची कॅम्पस सिलेक्शन च्या माध्यमातून विविध खाजगी कंपन्यांमध्ये निवड झालेली असून आता विद्यापीठाच्या चुकीमुळे निकालात त्रुटी असलेल्या विद्यार्थ्यांना या नोकऱ्यांपासून मुकावे लागणार का ?, असा प्रश्न उपस्थित होत आहे. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये विद्यापीठाच्या विरोधात प्रचंड रोष आहे. महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांनी पारंपरिक पद्धतीने ऑफलाईन डिस्क्रिप्टइव्ह पद्धतीने पेपर घेतले असून फक्त शिवाजी विद्यापीठाने ऑफलाईन MCQ पद्धतीने पेपर घेतल्यामुळे विद्यार्थ्यांच्या निकालात हा गोंधळ निर्माण झाला आहे. विधी शाखेच्या इंटेलेकच्युअल प्रॉपर्टी राईट्स (IPR) या विषयाच्या पेपरची काठिण्य पातळी जास्त असल्याचे सांगून विद्यापीठाने हा पेपर जवळपास एक महिन्यानंतर घेतला पण प्रत्यक्षात हा पेपर फुटलेला होता. याचा नाहक त्रास विद्यार्थ्यांना सहन करावा लागला आहे, या विषयाची दखल राज्यपालांनी देखील घेतली आहे. अनेक विद्याशाखांचे निकाल लागून एक महिना होत आला असून अद्यापही त्रुटी असलेल्या विद्यार्थ्यांचा सुधारित निकाल विद्यापीठाने जाहीर केलेला नाही. या सर्व विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेतर्फे शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरूंना निदर्शनास आणण्यासाठी आज पैसा फेको हे आंदोलन करण्यास कार्यकर्ते गेले होते. पण कुलगुरू नसल्या कारणास्तव कुलसचिवांना घेराव घालण्यात आला. यावेळी अभाविप प्रदेशमंत्री अनिल ठोंबरे यांनी कुलसचिवांना जाब विचारला की, पेपर फुटी प्रकरणी दोषी असणाऱ्यांवर कारवाही कधी करणार? पुढे बोलताना ते म्हणाले की, तसेच परीक्षा नियंत्रक हे निष्क्रिय असून त्यांना परीक्षा विभागाचा कोणताही अनुभव नाही. त्यामुळे विद्यार्थांना याचा त्रास सहन करावा लागत आहे. तसेच त्यांच्यावर चौकशी समिती बसवून समितीचा निर्णय येईपर्यंत त्यांना विद्यापीठाच्या कामकाजापासून दूर ठेवावे. अन्यथा अभाविप यापेक्षा अधिक तीव्र स्वरूपाचे आंदोलन करेल, असा इशारा प्रदेश मंत्री अनिल ठोंबरे यांनी दिला.

# मराठवाड्यातील मराठा समाजाचा ओबीसीमध्ये समावेश करा !

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** मराठवाड्यातील मराठा समाजाच ओबीसी मध्ये समावेश करा अशी मागणी मराठा समाजाच्या वतीने राज्य मागासवर्ग आयोगाने १२ सप्टेंबर रोजी पुणे येथे आयोजीत सुनावणीत केली आहे. या वेळी आयोगा समोर मराठवाड्या तील तत्कालीन पांच जिल्ह्यातील मराठा समाजाची स्थिती व मराठवाडा हा भाग आंध्रप्रदेश मधील एक भाग होता यावर मागणी करणारे किशोर गणपतराव चव्हाण यांनी सविस्तर पणे भुमिका मांडली व सन १९५३ ला आंध्रप्रदेश राज्याची निर्मिती झाली होती.सन १९५३ ते १९६० सालापर्यंत मराठा समाजाचा इतर मागासवर्गात समावेश होता. दि. ०१ मे १९६० रोजी संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाली त्यावेळेस मराठवाडा विनाअट महाराष्ट्रात सामील झाला होता. यावेळी आयोगा समोर विविध न्यायनिवाडे, केस लॉ व संदर्भा सह सुनावणीत मांडणी आरक्षणाचे जेष्ठ अभ्यासक राजेंद्र दाते पाटील यांनी करतांना अनेक महत्वाच्या बाबी पुढे आणल्या. महाराष्ट्र शासनाने दि. १ऑक्टोबर १९६२ साली इतर मागासवर्गाची यादी जाहीर केली होती, त्या यादीत अनुक्रमांक १८० वर जातीची नोंद असून त्यातील १८१ या क्रमांकावर मराठवाडयातील मराठा जातीची नोंद करणे महाराष्ट्र सरकारला गरजेचे होते. पण तसे केलेले नाही. त्यानंतर महाराष्ट्र सरकारने मराठवाडयातील मराठा जातीचा समावेश इतर मागासवर्गात अदयापही केलेला नाही. मराठवाडा हा त्याच वेळेस संयुक्त महाराष्ट्रात सामील झाला नसता तर आज रोजी आंध्रप्रदेशात मराठा जातीचा समावेश ओबीसी मध्ये असल्यामुळे मराठा समाजाची नोंद इतर मागासवर्गात राहीली असती. कारण आजही आंध्रप्रदेश राज्यात मराठा जातीचा समावेश इतर मागासवर्गात आहे. भाषा प्रांत वार रचनेत महाराष्ट्राचा भाग बेळगांव - निपाणी - कारवार सह तो सर्व भाग कर्नाटक राज्यात गेला. कर्नाटक राज्यात मराठा समाजाचा इतर मागासवर्गात समावेश असल्याने महाराष्ट्रातून कर्नाटक राज्यात आलेल्या भागातील मराठा जातीचा इतर मागासवर्गात समाविष्ट केलेले असल्याची नोंद असल्याचे लेखी दाखल केलेल्या निवेदनात केलेली असुन मराठवाडयासह हैद्राबाद स्टेटचा काही भाग विदर्भात समाविष्ट झालेला आहे त्यात यवतमाळ जिल्हयातील तीन तालुके ज्या मध्ये पुसद-उमरखेड- महागांव यासह हैद्राबाद स्टेट मधील जो भाग महाराष्ट्रात समाविष्ट झालेला आहे. त्यातील मराठा जातीचा इतर मागासवर्गात समावेश करुन १९६२ ते २०२२ पर्यंत शैक्षणिक-नौकरी विषयक अनुशेष भरण्यासाठी महाराष्ट्र शासनाला शिफारस करण्याची सुध्दा या सुनावणी दरम्यान निवेदना व्दारे तथा अर्जाव्दारे विनंती करण्यात आली असुन आयोगास नम्र विनंती कारण्यात आली की,सदरच्या निवेदनात तथा अर्जात नमूद केलेल्या सर्व संदर्भीय बाबी आणि अर्जातील तथा निवेदनातील नमूद बाबी शिफारस करण्यास पात्र असल्यामुळे त्या अनुषंगिक शिफारशी आयोगाने राज्य शासनाकडे करावी आणि अधिकची कागदपत्रे आणि पुरावे दाखल करण्यासाठी पुढील तारीख निश्चित करावी. या वेळी प्रा.गोपाळ चव्हाण यांनी निवेदनातील भूमीकेशी सहमती दर्शवून मराठवाड्यातील मराठा समाजाला न्याय देणे कामी आयोगाने शिफारस करावी अशी विनंती केली तर या प्रसंगी मदतनीसाची महत्वपुर्ण भूमिका सचिन गावंडे, रामभाऊ जाधव पार पाडली. आयोगाच्या वतीने सुनावणीसाठी अध्यक्ष न्यायमुर्ती निरगुडकर सदस्य सगर पाटील व इतर सदस्य उपस्थित होते.प्रदिर्घ चाललेल्या या सुनावणी च्या बाबत आयोगाचे अध्यक्ष यांनी सुचित केले की,सदरचा अर्ज आयोगाने स्वीकारला असुन या अर्जातील विनंती नुसार अधिकचे म्हणणे व पुरावे देता येतील या साठी आयोगाच्या वतीने पुढील वेळ दिला जाणार आहे. याचा संदर्भ लक्षात घेता मराठवाड्या तील मराठा समाजाने त्यांचे कडे असलेले पुरावे, महसुल पुरावे व उपलब्ध कागद पत्रे आमच्या कडे जमा करावी असे आवाहन किशोर गणपतराव चव्हाण,राजेंद्र दाते पाटील यांनी केले आहे.



# अन् युवकाने घेतली नदीत उडी

आधुनिक केसरी न्यूज

**यवतमाळ :** आर्णी बायपास वरील पुलावरुन एका अज्ञात युवकाने सायकल उभी करुन दिग्रस येथील धांवडा नदीत उडी घेतली. ही घटना आज सोमवारी सायंकाळी ५ वाजतच्या सुमारास घडली. चार दिवसापूर्वी विजय जाधव नामक युवकाने याच धावंडा नदीत उडी मारुन आत्महत्या केली. आता पुन्हा एका युवकाने उडी मारली आहे. हा अज्ञात युवक ५ वाजताचे सुमारास सायकलने नदीवर पुलावर आला. पुलावर सायकल उभी करुन चक्क नदीत उडी घेतली. पाहता पाहता तो २०० मीटर गेला आणी नदीच्या पाण्यात बुडाला. तिन दिवसांपासून संततधार पाऊस सुरु असल्याने अरुणावती धरण तुडूंब भरले. त्यामुळे शहरातील धावंडा नदी दुथडी भरुन वाहत आहे. या नदीच्या पाण्यात युवकाने उडी घेतली. हा युवक कोण व कुठला हे कळू शकले नाही. या घटनेची माहिती मिळताच ठाणेदार धर्मराज सोनुने व पोलीस पथकाने घटनास्थळ गाठले. या युवकाची शोध मोहिम सुर आहे. या घटनेची तहसीलदार प्रवीण धानोरकर यांनी नोंद घेतली.

# पुरातत्व विभागाच्या दुर्लक्षितपणामुळे लिंबीबारव कुंडाचे अस्तित्व धोक्यात

आधुनिक केसरी न्यूज

**यासीन शेख**

**लोणार :** येथे जगप्रसिद्ध सरोवर व पौराणिक महत्त्व असलेले प्राचीन मंदिरे, बारव शहरात असून भारतीय पुरातत्व विभाग अंतर्गत येणाऱ्या लोणी रोडवरील पौराणिक महत्त्व असणाऱ्या लिंबीबारव कुंडामध्ये पुरातत्व विभागाच्या नियोजनामुळे नालीतील संपूर्ण घाणपाणी आज धो... धो... करीत गेल्याने या पौराणिक वास्तूचे अस्तित्व धोक्यात आले आहे. शहरातील लोणी रोडवर असलेल्या पौराणिक महत्त्व असणाऱ्या काळा दगडातील पाषाणातील कामाचा उत्कृष्ट नमुना असणाऱ्या लिंबीबारव कुंडाचे जतन व संवर्धन करण्याची जबाबदारी पुरातत्व विभागाकडे आहे या लिंबीबारव कुंडाला पुरातत्व विभागाकडून चोहोबाजूने तारेचे कुंपण करण्यात आले आहे या कुंडाची आतील बाजूतील अनेक भिंतीची पडझड झाली असताना पुरातत्व विभागाकडून कोणतेही निर्माणाधीन काम करण्यात आले नाही याउलट या कुंडाच्या मागील बाजूस नगरपालिके मार्फत लेंडी तलावाकडे जाण्यासाठी शहरातील सांडपाण्याची नाली बांधलेली आहे परंतु या नालीमधून जाणारी लेंडी तलावाजवळील नाली पूर्णता खुली नसल्यामुळे शहरातील घाण पाणी लिंबीबारव मध्ये जात आहे लोणार शहरात आज जोरदार पाण्याने पावसाने हजेरी लावल्यामुळे शहरातील घाण सांडपाणी लिंबीबारव कुंडामध्ये गेल्याने हे कुंड पूर्ण भरण्याच्या स्थितीत असल्याने या पौराणिक वस्तूचे अस्तित्व धोक्यात आले आहे.याबाबत पुरातत्त्व विभागाने त्वरित लक्ष देऊन पौराणिक वास्तूचे जतन करण्यासाठी ठोस पावले उचलण्याची नितांत आवश्यकता असल्याचे मागणी मी लोणार समितीचे सदस्य सतीश कापुरे यांनी व्यक्त केली आहे.



# दहा नालायक लोकांपेक्षा, एका लायक मित्राची जीवनात गरज: प्रदीप जगताप

आधुनिक केसरी न्यूज

**सिल्लोड :** तालुक्यातील गणेशोत्सवा निमित्ताने आसडी येथे आर्य नवयुवक गणेश मंडळाने सालाबादप्रमाणे याही वर्षी गणेशोत्सव आदर्शवत पद्धतीने साजरा केला.या वर्षी चे प्रमुख आकर्षण म्हणजे महाराष्ट्राची मुलुख मैदानी बुलंद तोफ, शिवशंभूव्याख्याते प्रदीप जगताप पाटील.यांचा व्याख्यानाचे आयोजन ठरले,छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरवात झाली,यावेळी आपल्या दिमाखदार शैलीत उपस्थिताना शिवचरित्र ऐकवत असताना प्रत्येक श्रोत्याला आपण जणू काही इतिहासातच जगतोय की काय असा भास झाला शिवाय राहत नाही.पुढे बोलत असताना शिवव्याख्याते प्रदीप जगताप यांनी जीवनात मित्राचे महत्व पटाऊन सांगितले, दहा नालायक लोक आयुष्यात असल्या पेक्षा एक लायक मित्र आयुष्य असावा, अश्या मार्मिक शब्दात प्रदीप जगताप यांनी काळजाचा ठाव घेणारे प्रबोधन केले. व्याख्यानाच्याच सुरवातीला अचानक वरून राज्याने हजेरी लावली मात्र चालू पावसातही श्रोत्यांनी व्याखानाला भरभरून प्रतिसाद दिला,छत्रपती शिवाजी महाराज,संभाजी महाराज यांचे विचार जणू काही प्रत्येकाच्या काळजावर कोरून काढण्याचे



काम व्याख्याते प्रदीप जगताप यांनी केले,महाराष्ट्रातील ख्यातनाम भागवत कथाकार, हभप श्री अजबराव महाराज मिरगे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम सम्पन्न झाला.यावेळी गावचे पोलिस पाटील रंगनाथ मेटे शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष सांडु पाटील सुरडकर उप सरपंच आंबादास तुपे .कवि चंद्र भारती.आर्य नवयुवक गणेश मंडळ आसडी अध्यक्ष भागवत दादाराव मिरगे,उपाध्यक्ष आण्णा कडुबा कर्पे ,सदस्य कपिल तुपे कृष्णा कर्पे,संजय कर्पे,समाधान मिरगे,डॉ देवरे.पंढरी तुपे,कृष्णा तुपे आप्पा पंडीत आमोल मिरगे गोपाल तुपे आप्पा पाटील मिरगे पिराजि कर्पे ज्ञानेश्वर तुपे गणेश मिरगे भगवान तुपे गजानन पंडीत विनोद मिरगे विशाल मिरगे विठ्ठल कर्पे मोहन कर्पे,काकासाहेब कर्पे यांच्या सह हजारी ग्रामस्थांची उपस्थिती होती

# पोलीस शोधपथकाची दमदार कामगिरी चोरीच्या ५ मोटार सायकली हस्तगत

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** हिरे मेडिकल हॉस्पिटल च्या आवारात मोटरसायकलच्या चोरी वारंवार होत असल्यामुळे MSF कर्मचाऱ्यांच्या साह्याने चोराला पकडले आहे. शहरातुन दिवसेदिवस वाढत्या मोटर सायकली चोरीच्या घटना वाढत असल्यामुळे नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली धुळे शहर पो. ठाण्याचे शोध पथकातील कर्मचाऱ्यांनी रात्रगस्त दरम्यान धुळे शहरातील हिरे मेडिकल वैदयकिय महाविदयालय व हॉस्पीटल आवारात संशयीतरित्या फिरणाऱ्या दोन इसमांना महाराष्ट्र सुरक्षा बल (MSF) चे कर्मचारी यांचे मदतीने ताब्यात घेतले होते. नमुद आरोपीतांन कडे कसुन चौकशी केली असता संशयीता पैकी अरबाज ऊर्फ बबलु शेख रफीक वय २४ रा. लब्याक हॉटेल पवारवाडी ब्रिज जवळ मालेगाव जि.नाशिक यांने वेळोवेळी हिरे मेडिकल कॉलेज परीसरातीतुन तसेच धुळे शहरातुन मोटर सायकल चोरुन त्या मालेगांव येथील मोहम्मद हुसेन जमील अहमद वय २२ रा. बिस्मील्ला बाग रजा चौक मालेगाव जि . नाशिक कडे दिले असल्याची कबुली दिली. त्यावरुन मोहम्मद हुसेन जमील अहमद यास ताब्यात घेवुन दोन्ही आरोपीतांन कडे चौकशी केली असता त्यांचे कडुन चोरलेल्या एकुण ०५ मोटर सायकल हस्तगत करण्यात आल्या



असुन आरोपीतांन कडुन अधिक चौकशी करण्यात येत आहे . नमुद बाबत धुळे शहर पोलीस ठाणे गुरनं ५१८/२०२२ भादवि कलम ३७ ९ प्रमाणे दाखल गुन्हा दाखल असुन अधिक तपास पोहेकॉ/ जगदिश पाटील करीत आहेत. सदरची कारवाई मा.पो. अधीक्षक प्रविणकुमार पाटील सो.मा.अपर पोलीस अधीक्षक प्रशांत बच्छाव उप वि.पो.अधि. ईश्वर कातकाडे सो.यांचे मार्गदर्शना खाली धुळे शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांनी धुळे शहर पोलीस ठाण्याचे शोध पथकाचे सपोनि / दादासाहेब पाटील अमंलदार पोहेकॉ / विलास भामरे, पोहेकॉ / जगदिश पाटील, पोना / प्रल्हाद वाघ, पोकों / गुणवंतराव पाटील, तुषार मोरे, अविनाश कराड, प्रसाद वाघ, चापोकॉ / सचिन पगारे अशांनी केली आहे .

# औरंगाबादेत रविवारी 'रन फॉर युनिटी'चे आयोजन

## केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांची माहिती

आधुनिक केसरी न्यूज


**औरंगाबाद :** मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनानिमित्त औरंगाबाद शहरात येत्या १८ सप्टेंबर रोजी 'रन फॉर युनिटी'चे आयोजन करण्यात येणार आहे. या 'रन फॉर युनिटी'मध्ये विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या औरंगाबादकरांचा मोठा सहभाग असणार आहे, अशी माहिती केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांनी पत्रकार परिषदेत दिली.

जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या या पत्रकार परिषदेस जिल्हाधिकारी सुनील चव्हाण, निवासी उपजिल्हाधिकारी मंदार वैद्य, रॅलीचे संयोजक पंकज भारसाखळे, यांची प्रमुख उपस्थिती होती. या संयुक्त पत्रकार परिषदेत या 'रन फॉर युनिटी'च्या नियोजनाविषयी सखोल माहिती देण्यात आली.

केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांनी सांगितले की, 'पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पेतून 'रन फॉर युनिटी'चे आयोजन शहरात करण्यात येणार आहे. 'रन फॉर युनिटी' या उपक्रमात शालेय विद्यार्थी, महाविद्यालयीन विद्यार्थी, सीएमआय, व्यापारी महासंघ, मसिआ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, महापालिका, पंचायत समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, छावणी परिषद, पोलिस विभाग, आरटीओ, स्काऊट गाईड, एनसीसी, वन विभाग, औरंगाबाद फर्स्ट, क्रेडाई, डॉक्टर असोसिएशन, सीए असोसिएशन, रोटरी, जायंट्स, लायन्स क्लब, माजी सैनिक विभाग, एनजीओ अशा विविध शासकीय, निमशासकीय कार्यालयातील अधिकारी, कर्मचाऱ्यांसह क्रीडा क्षेत्रातील विविध खेळांच्या क्रीडा संघटनांचे पदाधिकारी, खेळाडू मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत, अशी माहिती डॉ. भागवत कराड यांनी यावेळी दिली.

'रन फॉर युनिटी' ही दौड तीन किलोमीटर अंतराची असणार आहे. विभागीय क्रीडा संकुल येथे येत्या रविवारी (१८ सप्टेंबर) सकाळी साडेसात वाजता सुरू होईल. या दौडमध्ये सहभागी होणाऱ्या सर्व सहभागींना प्रमाणपत्र दिले जाणार आहे. तसेच डॉक्टर असोसिएशनच्या वतीने वैद्यकीय सहायता पुरवली जाणार आहे. तर क्रीडा विभाग व औरंगाबाद ऑलिम्पिक संघटनेच्या वतीने दौडची तांत्रिक बाजू सांभाळण्यात येणार आहे. या दौडच्या मार्गाचे नियोजन पोलिस विभागातर्फे करण्यात येणार आहे.

'रन फॉर युनिटी'चे आयोजन यशस्वीरित्या करण्यासाठी जिल्हाधिकारी सुनील चव्हाण, पोलिस आयुक्त डॉ. निखिल गुप्ता, महापालिका आयुक्त व प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्यासह उपजिल्हाधिकारी मंदार वैद्य, शिक्षणाधिकारी एम. के. देशमुख, मनपा उपायुक्त रवींद्र निकम, जिल्हा क्रीडा अधिकारी चंद्रशेखर




घुगे, विद्यापीठाचे डॉ. संजय सांभाळकर यांच्यासह विविध खात्यातील अधिकाऱ्यांनी पुढाकार घेतला आहे. या दौडमध्ये सहभागींना ग्रीन ग्लोब फाऊंडेशन आणि टीएफआयतर्फे सिडबॉल देण्यात येणार आहे.

दौडचे नियोजन यशस्वी करण्याकरिता विविध समित्यांची स्थापना करण्यात येणार आहे. या दौडसाठी औरंगाबाद ऑलिम्पिक संघटनेचे अध्यक्ष पंकज भारसाखळे, शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार प्राप्त डॉ. उदय डोंगरे, सीएमआयचे अध्यक्ष नितीन गुप्ता, सचिव अर्पित सावे, दुष्यंत पाटील, मसिआचे अध्यक्ष भगवान राऊत, डॉक्टर असोसिएशनचे  डॉ. प्रफुल्ल जटाळे, विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. दयानंद कांबळे, माजी क्रीडा अधिकारी गोकुळ तांदळे, अॅथलेटिक्स कोच सुरेंद्र मोदी, टीएफआयचे दीपक कोलते, आनंद दरक, राहुल डुकरे, अनंत वजंरीनकर, मंगेश तोडेकर आदींनी पुढाकार घेतला आहे.

मराठवाडा मुक्ती संग्राम सेनानींना अभिवादन

हैदराबाद संस्थानमधून मराठवाडा मुक्त करण्यासाठी सरदार वल्लभभाई पटेल यांची भूमिका महत्वपूर्ण होती. या संग्रामात मराठवाड्यातील सेनानींनी आपल्या प्राणाची आहुती दिली. याचे स्मरण म्हणून रन फॉर युनिटीचे आयोजन मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त करण्यात आले आहे. या रनच्या माध्यमातून त्यांच्या त्यागाच्या योगदानाबद्दल तसेच येणाऱ्या पिढीला त्यांच्या त्यागाची जाण असावी यासाठी अनोख्या पध्दतीने मुक्ती संग्राम सेनानींना अभिवादन करण्यात येणार आहे.

# 'एसटी'त ऑनलाइन पेमेंट कधी?

आधुनिक केसरी न्यूज

**बहादुर चव्हाण**

**देव्हारी :** एसटीचा प्रवास सुलभ व्हावा अन् प्रवाशांना ऑनलाइन पेमेंट करता यावे, यासाठी महामंडळ अँड्रॉइड मशीन उपलब्ध करून देणार होते; मात्र अद्याप या मशीन मिळाल्या नाहीत. त्यामुळे प्रवाशांसह वाहकांनाही या मशीनची प्रतीक्षा लागली आहे.

एसटीचा प्रवास करताना सुट्ट्या पैशांसाठी वाहक व प्रवासी यांच्यात नेहमीच वाद होतात. याचा परिणाम कधी कधी हाणामारीपर्यंत जातो. त्यामुळे ही समस्या सोडविण्याच्या उद्देशाने, एसटी महामंडळाने अँड्रॉइड मशीन देण्याचे नियोजन केले आहे. या मशीनमुळे प्रवाशांना तिकिटाची रक्कम थेट ऑनलाइन देता येते. राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये या मशीन उपलब्ध झाल्या असल्या तरी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात मात्र अद्यापही या



उपलब्ध झाल्या नाहीत. त्यामुळे जुनी समस्या कायम आहे. प्रवाशांना सुटे पैसे घेऊनच प्रवास करावा लागत आहे.

**अँड्रॉइड मशीनच उपलब्ध नाही**

राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये या मशीन आल्या आहेत. त्याचा प्रत्यक्ष वापर सुरू झाला नसून, कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले जात आहे. छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यात अद्याप मशीन उपलब्ध झाल्या नाहीत. त्यामुळे अजून काहीकाळ या मशीनची वाट बघावी लागेल.

**ना कार्ड पेमेंट, ना गुगल पे, फोन पे**

सध्याच्या डिजिटल युगात सर्वच ठिकाणी ऑनलाइन पेमेंटची प्रक्रिया सुरू आहे. त्यामुळे एसटीत नव्याने उपलब्ध होणाऱ्या या मशीनद्वारे कार्ड पेमेंट करता येणार आहे. जिल्ह्याला मशीन उपलब्ध झाल्या नसल्याने सध्यातरी कार्ड पेमेंट, गुगल पे, फोन पे यासारख्या डिजिटलचा वापर प्रवाशांना करता येत नाही.

**मोफत प्रवास; त्यांनाही शून्य रकमेचे तिकीट**

एसटी महामंडळाने ज्येष्ठ नागरिकांना सवलत जाहीर केली आहे. त्यांच्यासाठी मोफत प्रवास असला तरी त्यांना शून्य रकमेचे तिकीट देण्यात येत असून त्यावर अमृत महोत्सव ज्येष्ठ नागरिक सवलत असे लिहिलेले असते.

# मोदींच्या वाढदिवशी भेटवस्तूंचा लिलाव

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यंदा वयाच्या ७३ व्या वर्षात पदार्पण करणार आहेत. १७ सप्टेंबर रोजी म्हणजेच मोदींच्या वाढदिवसासाठी भाजपकडून अनेक कार्यक्रम व सामाजिक उपक्रम राबिवण्यात येणार आहेत. यातीलच एक म्हणजे दरवर्षी मोदींच्या वाढदिवस सप्ताहात पार पडणारा लिलाव कार्यक्रम. यंदाही मोदींना भेट म्हणून मिळालेल्या तब्बल १२०० वस्तूंचा लिलाव होणार आहे. या लिलावातून मिळणारे पैसे नमामी गंगे मोहिमेसाठी दान दिले जातील. पंतप्रधान मोदींना मिळालेल्या भेटवस्तूंच्या ई-लिलावाची हे चौथे वर्ष आहे. प्राप्त माहितीनुसार, हा लिलाव pmmementos.Gov.In या वेब पोर्टलद्वारे आयोजित केला जाईल आणि १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत हा लिलाव पार पडणार असल्याचे नॅशनल गॅलरी ऑफ मॉडर्न आर्टचे महासंचालक अद्वैत गडानायक यांनी सांगितले.



# पुण्यासह 'या' जिल्ह्यांना झोडपणार पाऊस

आधुनिक केसरी न्यूज

पुणे :  मागील चार ते पाच दिवसांपासून महाराष्ट्रात पावसाचा जोर वाढला आहे. ऐन गणपती विसर्जनाच्या दिवशी बहुतांशी ठिकाणी पावसानं हजेरी लावल्याने गणेशभक्तांची पुरती तारांबळ उडाली होती. काल पुणे शहरासह जिल्ह्यात अनेक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस कोसळला आहे. यानंतर आज पुन्हा एकदा हवामान खात्याने राज्यात पावसाचा इशारा दिला आहे. पुढील दोन ते तीन तासांत पुण्यासह काही जिल्ह्यात पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. भारतीय हवामानशास्त्र विभागाचे वरिष्ठ शास्त्रज्ञ के एस होसाळीकर यांनी ट्वीट करत याबाबतची माहिती दिली आहे. पुढील काही तासांत पुण्यासह अहमदनगर, रत्नागिरी, बीड, सातारा, सिंधुदुर्ग, दक्षिण सोलापूर आणि ठाणे आदी ठिकाणी मेघगर्जनेसह मध्यम ते मुसळधार पावसाची शक्यता आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. आज मुंबईत ढगाळ हवामानाची नोंद करण्यात आली असून तुरळक ठिकाणी पावसाच्या सरी कोसळण्याची शक्यता आहे.

रविवारी सायंकाळी पुण्यात ढगफुटीसदृश्य पाऊस कोसळला आहे. दोन तास कोसळलेल्या पावसामुळे अनेक ठिकाणं जलमय झाली होती. अनेकांच्या घरात पाणी शिरल्याने जनजीवन विस्कळीत झालं होतं. पुण्यातील चंदननगर पोलीस ठाण्यातही गुडघाभर पाणी साचलं होतं. यानंतर आज पुन्हा एकदा पुण्यातील काही भागात मध्यम ते मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

# मुस्लीम पक्षकारांची याचिका फेटाळली

आधुनिक केसरी न्यूज

**वाराणसी :** ज्ञानवापी मशीद प्रकरणात वाराणसी सत्र न्यायालयाने हिंदू पक्षाच्या बाजूने निकाल दिला आहे. हिंदू पक्षाने दाखल केलेली याचिका सुनावणीयोग्य असल्याचे न्यायालयाने म्हटले आहे. मुस्लीम पक्षकारांची याचिका वाराणसी न्यायालयाने फेटाळली आहे. यासंदर्भात पुढील सुनावणी २२ सप्टेंबरला होणार आहे. "हा हिंदू समाजाचा विजय आहे. न्यायालयाचा हा निर्णय ज्ञानव्यापी मंदिरासाठी रचण्यात आलेला पाया आहे" अशी प्रतिक्रिया याचिकाकर्ते सोहन लाल आर्या यांनी दिली आहे. राज्यात शांतता टिकवण्याचे आवाहनही त्यांनी केले आहे. ज्ञानवापी मशीद परिसरात असलेल्या हिंदू देवतांच्या दैनंदिन पुजेच्या परवानगीसाठी पाच हिंदू महिलांनी न्यायालयात याचिका दाखल केली होती. धार्मिकदृष्ट्या संवेदनशील असलेल्या या याचिकेवरील निकाल जिल्हा न्यायाधीश ए. के. विश्वेश यांनी गेल्या महिन्यात राखून ठेवला होता. दरम्यान, न्यायालयाच्या निकालानंतर कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी वाराणसीत कलम १४४ लागू करण्यात आले आहे. ठिकठिकाणी पोलिसांचा चोख बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. 'अंजुमन इंन्तेझामिआ मशीद समिती'ने ज्ञानव्यापी मशिदीची जागा वक्फ बोर्डाची संपत्ती असल्याचा दावा करत हिंदू पक्षाने दाखल केलेल्या याचिकेवर प्रश्नचिन्ह उभे केले होते.

काही गुप्त गोष्टी
कुणाला सांगता येत नाहीत

(रविवारी मोफत तपासणी)

नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी,
वांझपणा असल्यास भेटा..!

(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व
उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)




डॉ. शेख ए.एच.

नवजीवन
आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# सुखी जीवनाचा मंत्र





डॉ. विजय दहिफळे

## हनिमून भाग - ०३

आधुनिक केसरी

* टॅब वॉटरचा वापर न करता पॅक्ड मिनरल वॉटरच प्यावे. कारण अनेक छोट्या-छोट्या तक्रारी या दूषित पाण्यामुळेच होतात.

* बाहेर फिरायला जात असताना सन ग्लास, सन स्क्रीन्स, छत्री, स्कार्फ, पाण्याची बॉटल, खायचे पदार्थ, ड्राय फ्रूटस्, मॉईंचरायझर, फेस टिश्यू, इं. गोष्टी सोबत असाव्यात.

* बीचवर कीटकदंशापासून सावध राहावे अनेक बीचवर असे किटक असतात. त्यामुळे शरीर झाकलेले असावे. शरीराला रीपेलंट क्रीम लावावे किंवा पायबंद शूज वापरावेत.

* जेवणापूर्वी किंवा काहीही खाण्याआधी हात स्वच्छ धुवावे.

* हनिमूनसाठी जर दुसऱ्या देशात जायचं असेल तर तिथली संस्कृती, खानपान, प्रेक्षणीय स्थळं आणि महत्त्वाचे म्हणजे त्या देशाची करन्सी माहिती असणं आवश्यक आहे.

* कारण काही देशांमध्ये रस्त्यावर किंवा बाहेर काही गोष्टी करण्यास मनाई आहे.

**प्रेग्नन्सी कशी टाळावी ?**

*स्त्री किंवा पुरुष दोघांपैकी एकाने याची काळजी घेणे किंवा दोघांनीही काळजी घेणे अति उत्तम.

* वेगवेगळ्या निरोधकांचा वापर करावा.

* सेफ पीरियड किंवा गर्भनिरोधक गोळ्यांचा वापर करावा.

* बऱ्याच वेळा 'जोश में होश खोने का डर' यामुळे निरोध ब्रेक होणे किंवा गर्भनिरोधक गोळी घेणे विसरणे इ. गोष्टी होतात त्याची काळजी घ्यावी.

* अशा वेळी मॉर्निंग आफ्टर पिलचा पर्यायही वापरला जातो.

* इमर्जन्सी पिल्स या सहसा नेहमी वापरु नयेत कारण त्यामुळे हार्मोनल इम्बॅलन्स होऊ शकतो. **(क्रमशः)**

संपर्क : डॉ. दहिफळे युरॉलॉजी अॅण्ड प्लास्टीक सर्जरी हॉस्पीटल, जिल्हा न्यायालयासमोर, अदालत रोड, बाबा पेट्रोल पंपाजवळ, औरंगाबाद, मोबा. : 9822326248,  फोन 0240-2364858
Email : drvijaydahiphale@gmail.com,
Website : www.dahiphalecosmeticurology.com